CMYK

# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १९ मे २०२६ | वर्ष - ४ थे | अंक ३५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## लालपरी अडकली खड्ड्यात

धुळे : धुळे शहरातील नवरंग पाण्याच्या टाकीसमोर आज एक अत्यंत धक्कादायक आणि प्रशासनाच्या निष्काळजीपणाची पोलखोल करणारी घटना घडली. भररस्त्यात अचानक रस्ता खचल्याने या मार्गावरून जाणारी एक एसटी बस लालपरी थेट खड्ड्यात अडकली. बसचे मागील चाक संपूर्णपणे या महाकाय खड्ड्यात रुतल्यानं बस एका बाजूला धोकादायक स्थितीत कलंडली होती. सुदैवाने या भीषण घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही आणि बसमधील प्रवासी सुरक्षित आहेत.

## नागपुरातील महालमध्ये मध्यरात्री गोळीबाराने दहशत

नागपूर : शहरातील महाल परिसर रविवारी मध्यरात्री गोळीबाराच्या आवाजाने हादरला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयापासून अवघ्या दीड किलोमीटर अंतरावर असलेल्या कोठीरोड परिसरात तीन दुचाकींवर आलेल्या सहा जणांच्या टोळक्याने दोन वेळा गोळीबार करत दहशत निर्माण केली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## पृथ्वीराज जखमी, महेंद्र गायकवाड हिंद केसरी

सातारा : साताऱ्यात पार पडलेल्या ५२ व्या हिंद केसरी स्पर्धेच्या अंतिम लढतीत पृथ्वीराज मोहोळ जखमी झाल्याने त्याने माघार घेतली. त्यामुळे सोलापूरच्या बाहुबली महेंद्र गायकवाडला हिंद केसरी घोषित करण्यात आले. महेंद्रने हिंद केसरीची गदा आणि थार गाडी जिंकली. अंतिम लढतीत पृथ्वीराजचा उजवा हात दुखावल्याने सामना अर्धवट राहिला.

## कांद्यासाठी आंदोलन

**छत्रपती संभाजीनगर : राज्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा रोष दिवसेंदिवस वाढत आहे. केंद्र सरकारने १२ रुपये ३५ पैशांचा भाव देऊन शेतकऱ्यांच्या तोंडाला पानं पुसली आहेत. याच पार्श्र्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरमध्ये समृद्धी महामार्गावर आंदोलन सुरु आहे. शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्त्वात आंदोलन सुरु आहे.**

## चांदीला झळाळी येणार ?

**मुंबई :तुम्ही चांदीमध्ये गुंतवणूक करण्याचा विचार करत आहात किंवा दागिन्यांची खरेदी करण्याची तयारी करत आहात? तर ही बातमी तुमच्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. भारत सरकारने चांदीच्या आयातीसंदर्भात मोठा निर्णय घेतला असून, त्याचा थेट परिणाम देशांतर्गत बाजारातील चांदीच्या किमतींवर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, येत्या काही महिन्यांत चांदीचे दर आणखी वाढू शकतात.**

## एअर इंडियाची सेवा कोलमडली

**मुंबई : मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर १८ मे रोजी एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानसेवेला मोठा फटका बसला आहे. ग्राउंड हँडलिंगचे काम पाहणाऱ्या 'एआय एअरपोर्ट सर्व्हिसेस लिमिटेड'च्या कर्मचाऱ्यांनी अचानक संप पुकारल्याने ही अभूतपूर्व परिस्थिती उद्भवली. या संपामुळे विमानतळावरील दैनंदिन कामकाज पूर्णपणे विस्कळीत झाले असून, हैदराबादहून मुंबईत दाखल झालेल्या एका विमानातील प्रवाशांना तर लँडिंगनंतरही विमानतळावर ताटकळत राहण्याची वेळ आली.**

## NEET पेपरफुटी प्रकरणाचे पडसाद; अकोल्यात मनसे आक्रमक

अकोला : NEET पेपरफुटी प्रकरणात प्राध्यापक मोटेगावकर यांना अटक झाल्यानंतर अकोल्यात मनसे आक्रमक झाली आहे. मोटेगावकर यांच्या क्लासेससमोर मनसे कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी करत निषेध आंदोलन केले.

# इराण - अमेरिकेतील तणाव पुन्हा एकदा धोकादायक पातळीवर !

वृत्तसंस्था

वॉशिंग्टन : इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव पुन्हा एकदा धोकादायक पातळीवर पोहोचला आहे. ४० दिवसांच्या युद्धविरामाची स्थिती असली तरी दोन्ही देशांमधील संघर्ष पूर्णपणे थांबलेला नाही. अशातच इराणकडून अमेरिकेला देण्यात आलेल्या तीव्र इशाऱ्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर खळबळ उडाली आहे.



इराणचे एक्सपीडियन्सी कौन्सिल सदस्य आणि इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स चे माजी कमांडर मोहसेन रझाई यांनी अमेरिकेला थेट इशारा देत म्हटले की, जर अमेरिकेने इराणी बंदरांवरील नौदल घेराबंदी हटवली नाही, तर ओमान समुद्र अमेरिकन सैन्यासाठी स्मशानभूमी ठरेल. इराणच्या सरकारी दूरचित्रवाहिनीवर बोलताना रेजाई यांनी अमेरिकेच्या कारवायांना युद्धजन्य कृती असे संबोधले. त्यांनी म्हटले की, इराणच्या समुद्री मार्गांवर आणि बंदरांवर दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू असून, त्याला प्रत्युत्तर देणे हा इराणचा अधिकार आहे. त्यांच्या या विधानानंतर मध्यपूर्वेतील तणाव पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

रेजाई यांनी दावा केला की, अमेरिकेची घेराबंदी जितकी जास्त काळ कायम राहील तितका त्याचा परिणाम जागतिक व्यापारावर होईल. विशेषतः तेल वाहतूक आणि आंतरराष्ट्रीय समुद्री मार्गांवर त्याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. हा तणाव कमी करण्यासाठी राजनैतिक चर्चा सुरू आहेत, मात्र अमेरिकेने प्रामाणिक भूमिका घेणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही इराणला कठोर इशारा दिला आहे. ट्रम्प म्हणाले, इराणकडे आता फार कमी वेळ उरला आहे. त्यांनी अमेरिकेच्या शांतता प्रस्तावावर तातडीने निर्णय घेतला नाही, तर तिथे काहीही शिल्लक राहणार नाही. त्यांच्या या वक्तव्यामुळे दोन्ही देशांतील तणाव आणखी तीव्र झाल्याचे मानले जात आहे. काही दिवसांपूर्वी अमेरिकेने इराणसमोर चर्चेसाठी पाच प्रमुख अटी ठेवल्या होत्या. त्यामध्ये संवर्धित युरेनियम अमेरिकेकडे सुपूर्द करणे, केवळ एकच अणु केंद्र सुरू ठेवणे, नुकसानभरपाईची मागणी मागे घेणे, सर्व आघाड्यांवरील संघर्ष थांबवणे आणि इराणची जप्त मालमत्ता गोठवून ठेवण्याचा प्रस्ताव यांचा समावेश होता.

त्यावर आता इराणनेही स्वतःच्या पाच अटी मांडल्या आहेत. त्यामध्ये लेबनॉनसह संपूर्ण प्रदेशातील लष्करी कारवाया थांबवणे, इराणवरील आर्थिक निर्बंध हटवणे, जप्त केलेली इराणी मालमत्ता मुक्त करणे, युद्धातील नुकसानीची भरपाई देणे आणि होर्मुझ सामुद्रधुनीवरील इराणच्या सार्वभौमत्वाला मान्यता देणे या मागण्यांचा समावेश आहे.

विशेष म्हणजे, होर्मुझ सामुद्रधुनी ही जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल वाहतूक मार्गांपैकी एक मानली जाते. या भागात तणाव वाढल्यास जागतिक तेल बाजार, इंधन दर आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावर मोठा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे अमेरिका-इराण संघर्षाकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे..

# पंतप्रधान मोदींची स्वीडनच्या पंतप्रधानांसोबत द्विपक्षीय चर्चा

वृत्तसंस्था

गॉथेनबर्ग : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वीडनमधील गॉथेनबर्ग येथे पंतप्रधान महामहीम उल्फ क्रिस्टरसन यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा केली. स्वीडनच्या राजकुमारी क्राउन प्रिन्सेस व्हिक्टोरिया यांनीही या बैठकीत भाग घेतला आणि महामहीम राजे कार्ल सोळावे गुस्ताफ आणि राणी सिल्व्हिया यांच्या वतीने हार्दिक शुभेच्छा दिल्या. पंतप्रधान मोदी यांनी महामहीम राजांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

दोन्ही नेत्यांनी भारत-स्वीडन संबंधांच्या सर्व पैलूंचा आढावा घेतला आणि व्यापार व गुंतवणूक, नवोन्मेष, हरित संक्रमण, उदयोन्मुख तंत्रज्ञान, संरक्षण आणि सुरक्षा, डिजिटलायझेशन, लघु आणि मध्यम उद्योग, अंतराळ, संशोधन, शिक्षण, संस्कृती आणि दोन्ही देशांमधील परस्पर संबंध या क्षेत्रांमधील द्विपक्षीय संबंधांना चालना मिळत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. सामायिक लोकशाही मूल्यांवर आधारित आणि नवोन्मेष, शाश्र्वतता व संशोधन आणि विकास या क्षेत्रांमधील परस्पर-संबंधांनी अधिकाधिक वृद्धिंगत होणारे हे द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्याच्या त्यांच्या सामायिक वचनबद्धतेचा त्यांनी पुनरुच्चार केला. या विस्तारत चाललेल्या भागीदारीला दिशा देण्यासाठी नियमित उच्च-स्तरीय राजकीय सहभाग आणि संस्थात्मक संवाद राखण्याच्या महत्त्वावर त्यांनी भर दिला.

भारत-स्वीडन नातेसंबंध धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेण्यावर दोन्ही नेत्यांचे एकमत झाले. ही धोरणात्मक भागीदारी स्थैर्य आणि सुरक्षेसाठी धोरणात्मक संवाद; पुढील पिढीची आर्थिक भागीदारी; उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि विश्र्वासार्ह संपर्कव्यवस्था; आणि उद्याच्या भविष्याला एकत्र आकार देणे - लोक, ग्रह, आरोग्य आणि लवचिकता या चार स्तंभांद्वारे मार्गदर्शित असेल. या धोरणात्मक भागीदारीची अंमलबजावणी करण्यासाठी, राजकीय, आर्थिक, तांत्रिक, सुरक्षा, हवामान आणि दोन्ही देशांतील जनतेमधील परस्पर संबंधांच्या क्षेत्रातील सहकार्यासाठी एक व्यापक आराखडा प्रदान करणाऱ्या, 'भारत-स्वीडन संयुक्त कृती योजना २०२६ - २०३०' चा दोन्ही नेत्यांनी स्वीकार केला.

# उत्तर प्रदेशामध्ये ट्रक-मॅजिकच्या धडकेत १० जणांचा मृत्यू

वृत्तसंस्था

लखनौ : येथील लखीमपूर खेरी येथे सोमवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण रस्ते अपघातात १० जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पीलीभीत-बस्ती महामार्गावर अदलीसपूर गावाजवळ भरधाव ट्रकने समोरून येणाऱ्या मॅजिक वाहनाला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत मॅजिक वाहनाचा पूर्ण चक्काचूर झाला. वाहनात दोन महिलांसह अंदाजे एकूण १२ जण प्रवास करत होते. अपघात इतका भयंकर होता की सर्वांचा जागीच मृत्यू झाला, तर एका गंभीर जखमीचा उपचारासाठी नेत असताना मृत्यू झाला.



प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मॅजिक वाहन लखीमपूरहून सिसैया दिशेकडे जात होते. त्याचवेळी बहराइचकडून येणारा ट्रक भरधाव वेगात होता. अचानक चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि ट्रकने समोरून येणाऱ्या मॅजिक वाहनाला जबर धडक दिली. धडक इतकी प्रचंड होती की मॅजिक वाहन जवळपास दहा फूट अंतरापर्यंत फरफटत गेले आणि रस्त्याच्या कडेला जाऊन थांबले. अपघातानंतरचे दृश्य अत्यंत हृदयद्रावक होते. मॅजिक वाहनात बसलेले अनेक प्रवासी सीटच्या मध्येच अडकून पडले होते. काहींची डोकी फुटली होती, तर एका व्यक्तीचा संपूर्ण चेहरा फाटल्याची माहिती समोर आली आहे. धडकेच्या तीव्रतेमुळे दोन प्रवासी वाहनाबाहेर फेकले गेले आणि रस्त्यावर पडले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. घटनास्थळी सर्वत्र रक्ताचे डाग पसरले होते. आसपासच्या नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले आणि पोलिसांना माहिती दिली.

माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी जखमींना बाहेर काढण्याचे काम सुरू केले. एका गंभीर जखमी व्यक्तीला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचाही मृत्यू झाला. त्यानंतर सर्व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले.

# पंजाबनंतर आता जम्मू-काश्मीर ड्रग्जचे नवे हॉटस्पॉट!

## १३ लाखांहून अधिक युवक ड्रग्जच्या आहारी

वृत्तसंस्था

श्रीनगर : : पंजाबनंतर आता जम्मू-काश्मीर अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. सरकारी आकडेवारीनुसार, राज्यातील तब्बल १३.५ लाखांहून अधिक लोक विविध प्रकारच्या ड्रग्जच्या आहारी गेले आहेत. विशेष म्हणजे २०२२ मध्ये हा आकडा सुमारे ६ लाखांच्या आसपास होता. अवघ्या काही वर्षांत व्यसनाधीनांची संख्या दुपटीहून अधिक वाढल्याने प्रशासन, सुरक्षा यंत्रणा आणि समाजमनात गंभीर चिंता निर्माण झाली आहे.

अधिकाऱ्यांच्या मते, जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादासोबतच आता ड्रग्जचे जाळेही मोठे संकट बनले आहे. सीमावर्ती भागातून पाकिस्तानमार्गे अंमली पदार्थांची तस्करी होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. यामुळे केवळ युवकांचे भविष्य उद्ध्वस्त होत नाही, तर राज्याच्या सुरक्षेलाही मोठा धोका निर्माण होत आहे. राज्याचे डीजीपी नलिन प्रभात यांनीही याबाबत गंभीर इशारा दिला आहे. त्यांनी पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद आणि ड्रग्ज नेटवर्क यांच्यातील संबंधांकडे लक्ष वेधत ड्रग्ज हा आता जम्मू-काश्मीरसमोरील सर्वात मोठ्या सामाजिक आणि सुरक्षा समस्यांपैकी एक बनला आहे, असे म्हटले आहे.

या वाढत्या संकटाचा सामना करण्यासाठी प्रशासनाने राज्यभर १०० दिवसांची विशेष नशामुक्ती मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेत आतापर्यंत १ कोटींहून अधिक लोकांनी सहभाग घेतल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. शाळा, महाविद्यालये, धार्मिक संस्था आणि स्थानिक समुदायांच्या माध्यमातून युवकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दक्षिण काश्मीरमधील मोहम्मद अमीन यांनी सांगितलेली कथा या संकटाची भीषणता स्पष्ट करणारी आहे. त्यांचा मुलगा वकील बनण्याचे स्वप्न पाहत होता. मात्र शाळेत मित्रांच्या दबावामुळे त्याने प्रथम सिगारेट ओढण्यास सुरुवात केली. त्यानंतर हळूहळू तो चरस आणि नंतर हेरोईनच्या आहारी गेला. व्यसन इतके वाढले की ड्रग्ज खरेदीसाठी त्याने घरातील वस्तू विकण्यास सुरुवात केली. अखेर संपूर्ण कुटुंब आर्थिक आणि मानसिक संकटात सापडले.

ड्रग्जच्या व्यसनातून बाहेर पडलेले आदिल भट यांनी सांगितले की, जम्मू-काश्मीरमध्ये हे जाळे अत्यंत संघटित पद्धतीने कार्यरत आहे. त्यांच्या मते, अनेक स्थानिक टोळ्यांचे संबंध पंजाबमधील मोठ्या ड्रग्ज डीलर्सशी आहेत. सीमावर्ती भागातून अंमली पदार्थ राज्यात आणले जातात आणि त्यानंतर युवकांना लक्ष्य केले जाते. (JAMMU KASHMIR DRUG CASE)

प्रशासनाने या प्रकरणात कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. एनडीपीएस (छऊझड) कायद्यांतर्गत आतापर्यंत ७०४ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. याशिवाय राज्यातील १६५ संवेदनशील भागांची ओळख पटवण्यात आली आहे, जिथे अंमली पदार्थांची विक्री आणि वापर अधिक प्रमाणात होत असल्याचे आढळले आहे. या भागांवर विशेष नजर ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त आणि गुप्त पाळत ठेवली जात आहे.

# 'नमाज पठण करायचे असेल तर शिफ्टमध्ये करा, प्रेमाने ऐकाल तर ठीक, नाहीतर...'; योगी आदित्यनाथ

वृत्तसंस्था

लखनौ : आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्र्वभूमीवर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. राजधानी लखनौमध्ये आयोजित करण्यात आलेल्या एका विशेष कार्यक्रमात बोलताना त्यांनी सार्वजनिक रस्त्यांवर नमाज अदा करण्याच्या प्रथेवर थेट प्रहार केला. नमाज पठण करायचेच असेल तर ते वेगवेगळ्या शिफ्टमध्ये म्हणजे टप्प्याटप्प्याने करा. जर तुम्ही ही बाब सामंजस्याने आणि प्रेमाने स्वीकारली तर उत्तमच आहे, परंतु जर तसे झाले नाही, तर परिस्थिती हाताळण्यासाठी प्रशासनाकडे दुसरे कठोर मार्ग देखील उपलब्ध आहेत, असा सज्जड दमच त्यांनी यावेळी दिला. त्यांनी प्रशासनाची आणि सरकारची भूमिका अत्यंत स्पष्ट आणि पारदर्शक असल्याचे यातून दाखवून दिले.



उत्तर प्रदेशातील सध्याच्या कायदा आणि सुव्यवस्थेचे उदाहरण देताना योगींनी स्पष्ट केले की, सार्वजनिक रस्ते हे केवळ नागरिकांच्या वाहतुकीसाठीच राखीव आहेत. ते म्हणाले, देशभरातून अनेक जण मला आश्र्चर्याने विचारतात की, उत्तर प्रदेशमध्ये खरोखरच रस्त्यावर नमाज पठण बंद झाले आहे का? यावर माझे ठाम उत्तर असते की, होय, आमच्या राज्यात रस्त्यांवर नमाज अदा करण्याची अजिबात परवानगी नाही. कुणालाही शंका असेल तर त्यांनी प्रत्यक्ष येऊन खात्री करावी. रस्ते अडवून सर्वसामान्य जनतेची, रुग्णवाहिकांची आणि अत्यावश्यक सेवांची कोंडी करण्याचा अधिकार कोणत्याही गटाला किंवा समुदायाला नाही. ज्या धार्मिक विधींसाठी जी प्रार्थनास्थळे निश्र्चित केली आहेत, तिथेच ते पार पडले पाहिजेत, यावर त्यांनी विशेष भर दिला.

प्रार्थनास्थळांवरील जागेच्या अभावामुळे रस्त्यावर यावे लागते, या युक्तिवादावरही मुख्यमंत्र्यांनी सविस्तर भाष्य केले. ते म्हणाले की, काही लोकांनी माझ्याकडे तक्रार केली की आमची लोकसंख्या जास्त असल्याने मशिदीत जागा पुरत नाही आणि नाइलाजाने रस्त्यावर नमाज पढावी लागते. यावर मी त्यांना अत्यंत स्पष्ट शब्दांत सुचवले आहे की, जागा अपुरी असेल तर तुम्ही एकाच वेळी गर्दी न करता वेगवेगळ्या 'शिफ्ट्स' (टप्प्यांमध्ये) नमाज अदा करू शकता. जर तुमच्याकडे मोठी जागा नसेल, तर गर्दीवर नियंत्रण ठेवणे ही सर्वस्वी तुमचीच जबाबदारी आहे. तुम्हाला जर समाजाचा आणि इथल्या व्यवस्थेचा एक भाग म्हणून राहायचे असेल, तर संविधानाने आखून दिलेल्या नियमांचे आणि कायद्यांचे काटेकोरपणे पालन करावेच लागेल.

आपल्या भाषणाचा समारोप करताना योगी आदित्यनाथ यांनी पुन्हा एकदा 'कायदा सर्वांसाठी समान आहे' या तत्त्वाचा पुनरुच्चार केला. त्यांनी स्पष्ट केले की, प्रशासनाचा नमाज पठणाला कोणताही विरोध नाही, मात्र त्याचा त्रास रस्त्यावरून चालणाऱ्या सामान्य नागरिकांना, रुग्णांना किंवा व्यापाऱ्यांना होता कामा नये. कुणालाही रस्ते वेठीस धरू दिले जाणार नाहीत, असा इशारा देत त्यांनी हुल्लडबाजांना आणि कायदा हातात घेणाऱ्यांना कडक शब्दांत सुनावले. राज्यात कोणत्याही प्रकारची अराजकता खपवून घेतली जाणार नाही. प्रशासनाचे काम संवाद साधणे आहे आणि आम्ही तो प्रेमाने साधत आहोत. पण, जर कोणी सामंजस्याने ऐकणार नसेल, तर त्यांनी थेट कारवाईला आणि संघर्षाला सामोरे जाण्याची तयारी ठेवावी. नुकतेच बरेलीमध्ये काही उपद्रवी लोकांनी असा प्रयत्न करून पाहिला होता, पण त्यांना त्यांच्या कृत्याची योग्य ती शिक्षा मिळाली आहे, असा थेट दाखला देत उत्तर प्रदेशात गुंडगिरीला अजिबात थारा नसल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले.

# राज्यातील तीर्थक्षेत्रे, गडकिल्ले आणि ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी ९९३ कोटी : मुख्यमंत्री

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई : राज्यातील ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा लाभलेल्या गडकिल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्याला राज्य शासनाने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. या पार्श्र्वभूमीवर, तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करत भाविक आणि पर्यटकांसाठी अत्याधुनिक पायाभूत सोयी-सुविधांसह दर्जेदार आरोग्य यंत्रणा सज्ज करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशप-वीर ऋरवपर्रींळी) यांनी दिले आहेत. सोमवारी मंत्रालयात आयोजित उच्चस्तरीय शिखर समितीच्या बैठकीत राज्यातील प्रमुख ६ तीर्थक्षेत्रे व ऐतिहासिक स्थळांच्या कायापालटासाठी एकूण ९९३.७२ कोटी रुपयांच्या भव्य विकास आराखड्यांना आणि निधीला मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिली आहे. सर्व विकासकामे दर्जेदार दर्जाची असावीत आणि ती निश्र्चित कालमर्यादेतच पूर्ण व्हावीत, असे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले.**

**सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची महत्त्वपूर्ण बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशप-वीर ऋरवपर्रींळी) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत ३ जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या ६ महत्त्वाच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.**

# अमेरिका-इराण युद्धामुळे गडकरींच्या कुटुंबाला कोट्यवधींचा फटका

तभा वृत्तसेवा

नागपूर : मध्य पूर्वेत अमेरिका आणि इराण यांच्यात सुरु असलेल्या संघर्षाचा फटका जगभरातील देशांना बसला आहे. इंधनाच्या किमती आभाळाला भिडल्यानं अनेक देशांच्या अर्थव्यवस्था संकटात सापडल्या आहेत. महागाई वाढल्यानं सर्वसामान्य जनता मेटाकुटीला आली आहे. अमेरिका-इराण संघर्षामुळे केंद्रीय गडकरी यांच्या कुटुंबालादेखील मोठा आर्थिक फटका बसला आहे. इराण आणिअमेरिकायांच्यातील संघर्षामुळे नितीन गडकरी यांच्या कुटुंबाचे शेकडो व्यावसायिक कंटेनर रस्त्यात अडकले. त्यामुळे त्यांना कोट्यवधींचं नुकसान सहन करावं लागलं. दस्तुरखुद्द नितीन गडकरी यांनीच याबद्दलची माहिती दिली आहे. नागपुरमध्ये आयोजित एका कार्यक्रमात केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी त्यांच्या कुटुंबाला सहन करत असलेल्या अडचणींवर सविस्तर भाष्य केलं.मी साखरेपासून डिटर्जंट तयार करतो. हे सगळं काम माझी सून पाहते. आम्ही तयार केलेल्या डिटर्जंटचे जवळपास १०० कंटेनर प्रत्येक महिन्याला अमेरिकेला जातात. पण युद्ध सुरु झाल्यापासून कंटेनर जाणं पूर्णपणे बंद झालं. त्यामुळे व्यवसायात मोठं नुकसान झालं. पण या संकटानंतरही आम्ही हार मानली नाही. आम्ही स्थानिक बाजारात माल पुरवठा सुरु केला. पण या कालावधीत अडचणींचा सामना करावा लागला, असं गडकरींनी सांगितलं.डिटर्जंट व्यवसायासोबतच गडकरी यांच्या मुलाच्या आंतरराष्ट्रीय व्यवसायावरदेखील मध्य पूर्वेतील संकटाचा परिणाम झाला. गडकरी यांच्या मुलाचा इराण सोबत मोठा व्यापार आहे. या व्यापाराच्या अंतर्गत केळ्यांची इराणला निर्यात होते. तर तिथून सफरचंद भारतात मागवली जायची. दोन देशांमध्ये युद्ध सुरु होताच पुरवठा साखळी विस्कळीत झाली. त्यामुळे ४०० कंटेनर रस्त्यात अडकले. त्यातील केळी सडून गेली. इराणमधून २०० कंटेनर सफरचंद खराब झाली, अशा शब्दांत गडकरींनी त्यांच्या कुटुंबाला व्यवसायात झालेल्या नुकसानाची माहिती दिली.



यावेळी नितीन गडकरींनी विमा कंपन्यांबद्दल जाहीर नाराजी व्यक्त केली. इतकं नुकसान होऊनही विमा कंपन्या विम्याचे पैसे देताना चालढकल करत असल्याचं गडकरींनी सांगितलं. कौटुंबिक व्यवसायात कोट्यवधी रुपयांचं नुकसान होऊनही गडकरी यांनी व्यावसायिकांना प्रोत्साहन दिलं. 'आव्हानं ही प्रत्येक व्यवसायाचा भाग असतात. व्यवसायात चढ-उतार येत असतात. अशा स्थितीत घाबरुन जाण्याऐवजी सकारात्मक विचार ठेवून कृती करणं गरजेचं आहे,' असं गडकरी म्हणाले.

## गौतम अदाणी यांनी बिहारमध्ये 150 कोटीं रुपयांची नेत्रसेवा सुरू केली

छत्रपती संभाजीनगर: 'सेवा ही साधना आहे' या विचाराने प्रेरित होऊन अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी यांनी आज बिहारमध्ये 150 कोटी रुपयांच्या मोठ्या नेत्र आरोग्य सेवेची पायाभरणी केली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील लोकांना कमी खर्चात डोळ्यांचे उपचार मिळणार आहेत. ग्रामीण नेत्र आरोग्य प्रकल्पाच्या भूमिपूजन कार्यक्रमात सहभागी होताना त्यांनी देशभरात नेत्र आरोग्यासाठी आणखी एका मोठ्या मोहिमेची घोषणा केली. मस्तीचक येथे सुरू होणाऱ्या या उपक्रमातून दरवर्षी सुमारे 3.3 लाख डोळ्यांच्या शस्त्रक्रिया करता येणार आहेत. तसेच दरवर्षी नेत्र आरोग्य क्षेत्रातील 1,000 आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. हा उपक्रम भविष्यात ग्रामीण भागातील जगातील सर्वात मोठ्या नेत्र आरोग्य नेटवर्कपैकी एक ठरू शकतो.

## हरित लोक चळवळ पर्यावरणात सकारात्मक बदल

छत्रपती संभाजीनगर- सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात एका आगळ्यावेगळ्या प्रकारच्या लष्करी शिस्तीचा हरित उठाव सुरु आहे अवघ्या सांगली जिल्ह्यात या अनोख्या उपक्रमाचा गवगवा पाहायला मिळतोय. जिल्ह्यातील तरुण आमदार सुहास बाबर यांच्या पुढाकारातून या हरित क्रांतीचं नेतृत्त्व पाहायला मिळत आहे. आडनिड्या ठिकाणी वाढलेलं पिंपळाचं झाड, तोडू नये त्याऐवजी त्याची पुनर्स्थापना करावी म्हणून सुरु झालेला प्रवास आता हजारो सांगलीकरांचा सहभाग असलेल्या ट्री आर्मीपर्यंत येऊन ठेपला आहे असं आमदार सुहास बाबर यांनी सांगितलं.

## डॉ. केतन देशपांडे यांना 'डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार' प्रदान

पुणे, शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनासाठी झटणाऱ्या 'फ्रेंड्स युनियन फॉर एनर्जायझिंग लाइव्ह्ज' (फ्युएल) या संस्थेचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. केतन देशपांडे यांना मानाच्या 'डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार २०२६' ने नुकतेच सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथील 'इंडिया हॅबिटॅट सेंटर'मध्ये आयोजित एका दिमाखदार सोहळ्यात "शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले उत्कृष्ट प्रयत्न" या श्रेणीत त्यांना हा गौरव प्रदान करण्यात आला. हिरो ग्रुपचे संस्थापक डॉ. ब्रिजमोहन लाल मुंजाल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ दिला जाणारा हा पुरस्कार समुदाय विकास आणि तळागाळातील सामाजिक बदलांसाठी कार्यरत असलेल्या व्यक्तींना दिला जातो. रमण कांत मुंजाल फाउंडेशन आणि हिरो फ्युचर एनर्जीज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पुरस्कार सोहळ्याचे हे तिसरे वर्ष होते. या सोहळ्यात शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेल्या उत्कृष्ट प्रयत्न या श्रेणीत डॉ. केतन देशपांडे यांना डॉ. बी.एम.एल. मुंजाल सोशल इम्पॅक्ट पुरस्कार २०२६' ने सम्मानित करण्यात आले। स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र आणि 1 लाख रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरुप होते।

## नमन गोसालिया आणि अँजिनाएक्स हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी प्रतिबंधाला जागतिक स्तरावर नेत आहेत

मुंबई— भारतासाठी हा एक अभिमानाचा क्षण आहे, कारण हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी प्रतिबंधाला ऐच्छिक न ठेवता, एक मूलभूत गरज बनवण्यासाठी नमन गोसालिया यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे, आता भारतात जन्मलेल्या अँजिनाएक्सला जगभरातील प्रमुख हृदयरोग संघटनांचे अध्यक्ष, जागतिक आरोग्यसेवा नेते, धोरणकर्ते, संस्था आणि आंतरराष्ट्रीय सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील हितधारकांसोबत जागतिक आरोग्यसेवा आणि सार्वजनिक आरोग्य चर्चांमध्ये स्थान मिळत आहे. प्रतिबंधाला प्राधान्य देणाऱ्या आरोग्यसेवेबद्दलच्या त्यांच्या वाढत्या आग्रहामुळे त्यांना वर्ल्ड हार्ट फेडरेशनशी संबंधित मंचांवरील चर्चांमध्ये आणि संयुक्त राष्ट्रांच्या परिसंस्थेशी संलग्न असलेल्या व्यापक आरोग्य-धोरणात्मक चर्चांमध्ये आमंत्रित केले जात आहे, जिथे हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी प्रतिबंधाचे भविष्य अधिकाधिक जागतिक प्राधान्य बनत आहे.

## ग्रामीण नेत्र आरोग्यासाठी सुरू करणार मोठे 'सेवा अभियान'

बिहारमध्ये रविवारी देशातील सर्वात मोठ्या ग्रामीण आरोग्य कार्यक्रमांपैकी एका कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. अदाणी समूहाचे अध्यक्ष गौतम अदाणी मस्तीचक येथे पोहोचणार असून, तेथे ते भूमिपूजन करून ग्रामीण भागांसाठी नेत्र आरोग्य आणि कौशल्य विकासाशी संबंधित नव्या योजनांची पायाभरणी करणार आहेत.हा कार्यक्रम अदाणी फाउंडेशन आणि अखंड ज्योति आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येत आहे. याचा उद्देश स्वस्त उपचार गावागावांपर्यंत पोहोचवणे आणि विशेषतः उत्तर व मध्य भारतातील मागास भागांमध्ये अधिक चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. यासोबतच, अदाणी समूहाच्या दीर्घकालीन राष्ट्रनिर्माण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टिकोनात बिहारचे वाढते महत्त्वही यामुळे अधिक दृढ होणार आहे.

## परिचय शर्माचा 'समर' म्हणून दमदार प्रवेश; 'वसुधा' मालिकेत नवे नाट्यमय वळण

छत्रपती संभाजीनगर तभा वृत्तसेवा प्रतिनिधी : झी टीव्हीवरील लोकप्रिय 'वसुधा' मालिकेत आता नवे नाट्यमय वळण येणार असून अभिनेता परिचय शर्मा 'समर' या महत्त्वपूर्ण भूमिकेतून मालिकेत दमदार प्रवेश करत आहे. वसुधा आणि देव यांच्या आयुष्यात आधीच अनेक घडामोडी सुरू असताना समरच्या आगमनामुळे कथानक अधिक रंजक आणि गूढ बनणार आहे. समर ही व्यक्तिरेखा निष्ठा आणि डावपेच यांच्यातील सीमारेषा सांभाळणारी असल्याने त्याच्या खऱ्या हेतूबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. चौहान कुटुंबाशी त्याचे संबंध कथानकात भावनिक उलथापालथ घडवून आणणार आहेत.

या भूमिकेबद्दल बोलताना परिचय शर्मा यांनी सांगितले की, 'वसुधा'च्या सेटवरील अनुभव खूप चांगला असून सहकलाकारांनी उत्तम साथ दिली.

# बेगमपुरा हेरिटेज वॉक: 250 हून अधिक नागरिकांसह पालिका प्रशासनाची ऐतिहासिक सफर



छत्रपती संभाजीनगर, तभा वृत्तसेवा प्रतिनिधी ऐतिहासिक वारसा जपणे आणि नागरिकांमध्ये शहराच्या संस्कृतीबद्दल जनजागृती निर्माण करणे, या उद्देशाने आज रविवारी सकाळी 'बेगमपुरा हेरिटेज वॉक' (वारसा सफर) चे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आणि 'इन्टॅक' (INTACH - इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज) च्या छत्रपती संभाजीनगर चॅप्टरच्या वतीने या संयुक्त उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जुन्या शहराच्या वेशीबाहेर वसलेल्या बेगमपुरा भागातील जिवंत इतिहासाचा अनुभव घेण्यासाठी तब्बल २५० हून अधिक सजग नागरिक या सफरीमध्ये सहभागी झाले होते.

या हेरिटेज वॉकचे मार्गदर्शन 'इन्टॅक'चे सदस्य संकेत कुलकर्णी आणि आदित्य वाघमारे यांनी केले. या उपक्रमात शहराचे महापौर समीर राजूरकर, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, उपायुक्त अंकुश पांढरे आणि 'इन्टॅक'च्या निमंत्रक (Convenor) माया वैद्य यांच्यासह स्थानिक इतिहासकार, विद्यार्थी आणि वारसा प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवला.

* इतिहासाच्या पाऊलखुणांचा मागोवा:*

सकाळी ठीक ७:०० वाजता ऐतिहासिक 'थत्ते हौद' येथून या दोन तासांच्या सफरीला सुरुवात झाली. हा हौद म्हणजे तत्कालीन प्रगत जलव्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्राचा एक उत्कृष्ट नमुना आहे. तिथून पुढे बेगमपुरातील गल्लीबोळांमधून फिरताना मार्गदर्शकांनी अनेक दडलेल्या ऐतिहासिक

*कथांना उजाळा दिला:*

जुने वाडे आणि मंदिरे: या भागातील जुन्या वास्तू आणि मंदिरांमधून तत्कालीन सामाजिक सलोखा आणि पारंपरिक निवासी स्थापत्यशैलीचे दर्शन घडले. यावेळी थत्ते नहर, थत्ते परिवाराचे शहारासाठीचे योगदान यावेळी सांगण्यात आले.

* मुघलकालीन दिवाणखाना:* ऐतिहासिक पटेल वाड्यात मुघल काळातील भव्य राहणीमान आणि त्या काळातील वास्तुकलेची झलक यावेळी नागरिकांना पाहायला मिळाली.

* हनुमान व्यायामशाळा:* जुन्या काळातील पारंपरिक कुस्तीच्या आखाड्याला (व्यायामशाळेला) भेट देऊन शहराच्या क्रीडा आणि मल्लविद्येच्या परंपरेची माहिती घेण्यात आली.

*कुंभारगल्ली:* या सफरीचा समारोप कुंभारगल्लीतील पारंपरिक भट्ट्यांजवळ झाला. येथे पिढ्यानपिढ्या मातीची भांडी बनवण्याची कला जिवंत ठेवणाऱ्या स्थानिक कारागिरांशी नागरिकांनी संवाद साधला. या प्रसंगी डॉ. हंसराज डोंगरे यांनी कुंभारगल्लीच्या वैशिष्ट्यांचे सविस्तर वर्णन केले.

* शहराच्या वारशासाठी एकत्र येऊया:*

मान्यवरांचे आवाहन

याप्रसंगी बोलताना महापौर समीर राजूरकर यांनी नागरिकांना आपल्या ऐतिहासिक मुळांशी जोडण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, "बेगमपुरा परिसराला एक वेगळी ओळख असून तो आपल्या वैभवशाली भूतकाळाला वर्तमानाशी जोडणारा दुवा आहे. रविवारी सकाळी एवढ्या मोठ्या संख्येने नागरिक, विशेषतः तरुण पिढी, या उपक्रमात सहभागी झाली, यावरून आपल्या शहराचे हृदय येथील वारशासाठी धडधडत असल्याचे दिसून येते."

'इन्टॅक' चॅप्टरच्या निमंत्रक माया वैद्य म्हणाल्या, "वारसा म्हणजे केवळ दगडी वास्तू नव्हेत, तर त्यांच्यात राहणारा जिवंत समाज आणि संस्कृती आहे. आजच्या 'हेरिटेज वॉक'सारखे सामूहिक प्रयत्न बेगमपुराचा हा समृद्ध इतिहास पुढच्या पिढीपर्यंत जसाच्या तसा पोहोचवण्यास नक्कीच मदत करतील."

आपल्या शहरातील ऐतिहासिक वास्तूंचे रक्षण करणे आणि सांस्कृतिक वारशाबद्दल आदर बाळगण्याचा संकल्प सर्व उपस्थित नागरिकांनी केला. या सामूहिक प्रतिज्ञेने या यशस्वी सफरीचा समारोप झाला.

# महाराष्ट्र हँडबॉलच्या विकासाला नवी गती; छत्रपती संभाजीनगरात वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

### राज्य अजिंक्यपद स्पर्धांच्या आयोजनाची जबाबदारी विविध जिल्ह्यांना; राष्ट्रीय खेळाडूंचा आर्थिक गौरव



छत्रपती संभाजीनगर तभा वृत्तसेवा प्रतिनिधी

महाराष्ट्रातील हँडबॉल खेळाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र हँडबॉल असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा छत्रपती संभाजीनगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. संघटनेचे अध्यक्ष तथा राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला राज्यभरातील पदाधिकारी व प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर राज्य हँडबॉल संघटनेचे अध्यक्ष अतुल सावे, सचिव रणधीर सिंग, सहसचिव पंकज भारसाखळे, कोषाध्यक्ष सतीश ढोंडगे, जिल्हा संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत जोशी तसेच वरिष्ठ पदाधिकारी सुदेश मालप उपस्थित होते.

सभेमध्ये महाराष्ट्रातील हँडबॉल खेळ अधिक सक्षम, व्यापक आणि स्पर्धात्मक करण्यासाठी विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. ग्रामीण व शहरी भागातील नवोदित खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे, शालेय व महाविद्यालयीन स्तरावर स्पर्धांचे प्रभावी नियोजन, महिला खेळाडूंना अधिक संधी उपलब्ध करून देणे तसेच राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राची कामगिरी अधिक भक्कम करण्यासाठी व्यापक नियोजनावर विशेष भर देण्यात आला.

यावेळी राज्य संघटनेचे आगामी वार्षिक नियोजन व स्पर्धांचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले. प्रशिक्षकांच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी दोन आठवड्यांचा विशेष अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच पंचांच्या मानधनात वाढ, प्रशिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे, खेळाडूंना तांत्रिक मार्गदर्शन आणि जिल्हास्तरावर अधिकाधिक स्पर्धा आयोजित करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

२०२६-२७ साठी राज्य अजिंक्यपद स्पर्धांचे आयोजन पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे :

१२ वर्षांखालील मिनी गट स्पर्धा – मुंबई

१५ वर्षांखालील मुलांची स्पर्धा – छत्रपती संभाजीनगर

१५ वर्षांखालील मुलींची स्पर्धा – पुणे

१९ वर्षांखालील मुलांची स्पर्धा – अमरावती

१९ वर्षांखालील मुलींची स्पर्धा – सातारा

खुल्या गटातील स्पर्धा – बीड व चंद्रपूर

बीच हँडबॉल स्पर्धा – रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे आयोजित करण्याबाबत चर्चा

खेळाडूंना दर्जेदार मैदान, प्रशिक्षक आणि अत्याधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संघटनात्मक पातळीवर अधिक प्रभावी नियोजन करण्यावर सभेत विशेष भर देण्यात आला. याच प्रसंगी राज्य हँडबॉल संघटनेचे सहसचिव पंकज भारसाखळे यांच्या वतीने छत्रपती संभाजीनगरचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्वल करणाऱ्या राष्ट्रीय हँडबॉल खेळाडू सायली किरगत, महिंद्र गायकवाड आणि आर्यन वाहुळ यांना प्रत्येकी दहा हजार रुपयांची आर्थिक मदत देऊन गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## "कन्नडच्या सुरक्षेसाठी मोठे पाऊल; पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते 70 सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण"



तभा वृत्तसेवा

कन्नड:- दि.१७ मे - शहराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या ७० अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. यावेळी आमदार संजना जाधव तसेच पोलीस अधीक्षक डॉ. विनायकुमार राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

कन्नड शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ, शाळा परिसर तसेच संवेदनशील भागांमध्ये हे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून त्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. गुन्हेगारी घटनांवर नियंत्रण ठेवणे, वाहतूक व्यवस्थापन सुधारणे तसेच नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री संजय शिरसाट यांनी कन्नड तालुक्याच्या विकासासाठी शासनाच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे निधी कमी पडू दिला जाणार नाही, अशी ग्वाही दिली. शहराच्या विकासाबरोबरच नागरिकांच्या सुरक्षेलाही प्राधान्य देण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांच्या भाषणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

आमदार संजना जाधव यांनी कन्नड शहर आधुनिक आणि सुरक्षित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. नागरिकांच्या हिताच्या विविध विकासकामांसोबतच सुरक्षाविषयक उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पोलीस अधीक्षक डॉ. विनायकुमार राठोड यांनी सीसीटीव्ही प्रणालीमुळे गुन्हे उघडकीस आणणे अधिक सोपे होणार असून नागरिकांनीही पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केले. शहरातील सुरक्षा व्यवस्थेत हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# हजारो भाविकांनी घेतले भगवान मुनिसुव्रतनाथांचे दर्शन; शनि अमावस्येनिमित्त पैठण येथे महामस्तक अभिषेक महोत्सव भक्तिमय वातावरणात संपन्न



छत्रपती संभाजीनगर, तभा वृत्तसेवा : पैठण येथील श्री शनिग्रह अरिष्ट निवारक मुनिसुव्रतनाथ भगवान अतिशय क्षेत्र येथे शनिअमावास्येनिमित्त आयोजित भव्य महामस्तक अभिषेक महोत्सव आचार्य श्री १०८ सिद्धांतसागरजी महाराज व आचार्य श्री १०८ गुनभद्रनंदीजी महाराज ससंघ यांच्या सान्निध्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या महोत्सवासाठी महाराष्ट्रासह दिल्ली, मुंबई, पुणे, हैदराबाद, सुरत, राजस्थान, उत्तराखंड आदी ठिकाणांहून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली.

सकाळी भगवान मुनिसुव्रतनाथ विधान, धर्मध्वजारोहण व महामस्तक अभिषेक विधी भक्तिभावात पार पडले. सौधर्म इंद्र-इंद्राणी होण्याचा मान प्रतिभा, दीपक, स्वयंम, प्रियंका, सौरभ, रति, जीत, ओमांश, विवान अजमेरा परिवार (धाराशिव) यांना मिळाला. शांतीधारेचा मान देवेंद्र दीपेश जैन (दिल्ली), जलाभिषेकाचा मान कपिन आयुष जैन (उत्तराखंड), अभिषेकाचा मान जयेश काला (मुंबई), नारळ रस संदिप शितल धनशेट्टी (कर्नाटक), इक्षुरस सचिन किशन जैन (मुंबई), आम्ररस नीलम किर्ती अजमेरा परिवार, मोसंबी रस श्रेयांस विजयकुमार जैन (मुंबई) यांना मिळाला.

धर्मसभेत आचार्य सिद्धांतसागरजी महाराज यांनी संयम, साधना व चांगल्या कर्मांचे महत्त्व पटवून दिले. आचार्य गुनभद्रनंदीजी महाराज यांनी अभिषेक हा अंत:करण शुद्धीचा मार्ग असल्याचे सांगितले.

प्रमुख अतिथी म्हणून देवेंद्र स्नेहदेवी सूरजमल (दिल्ली), अमित बडजाते, नीलम अजमेरा, रतनलाल पहाडिया, विनय सुरथेधाने, अशोक जैन व मनोज चौधरी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अध्यक्ष महावीर बडजाते, महामंत्री विलास पहाडे, विजय पापडीवाल, जयकुमार बाकलीवाल, प्रमोद कासलीवाल, मनोज काला, प्रकाश कासलीवाल, कैलास पाटणी, किशोर भाकरे, सुमित गंगवाल, डॉ. संजय गंगवाल, डॉ. राजेंद्र काला, स्वदेश पांडे व अभिजित काला यांनी परिश्रम घेतल्याची माहिती नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी दिली.



## श्यामसुंदर बजाज यांचे निधन

पैठण दि १८ :- पैठण येथील प्रसिद्ध व्यवसायिक तथा भाजपाचे जनसंघापासुनचे जेष्ठ कार्यकर्ते ॲड श्यामसुंदर बजाज (७६) यांचे रविवारी दुपारी अल्पशा आजाराने निधन झाले आहे.त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी सुना, जावयी, नातवंडे असा परिवार आहे. प्राचीन नागघाट स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. प्रसिद्ध व्यापारी अभिजित बजाज यांचे ते वडील होत.



## दत्तात्रय मापारी यांचे निधन

सोयगाव,दि.१७ मे : येथील रहिवासी दत्तात्रय मुरलीधर मापारी (वय.७०)यांचे अल्पशा आजाराने रविवार रोजी सकाळी ७:३० वाजता मुंबई येथे निधन झाले.त्यांच्यावर दि.१८ सोमवार रोजी सकाळी १०:०० वाजता सोनानदी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,एक मुलगी,सुन,नातवंडे असा परिवार होत.सोयगाव नगरपंचायतच्या नगरसेविका संध्या किशोर मापारी यांच्या ते दिर होते.



## त्र्यंबक पवार यांचे निधन

सिल्लोड प्रतिनिधी : त्र्यंबक रामा पवार यांचे दीर्घ आजाराने निधन झाले.मृत्यू समयी त्यांचे वय 76 वर्षांचे होते.पत्नी दोन बहिणी चार मुले व नातवंड असा त्यांचा मोठा परिवार होता.दोन मुले शिक्षक व दोन मुले व्यवसायात होती.समृद्धी मेडिकलचे संचालक प्रकाश पवार यांचे ते वडील होत .

# बसस्टँड रोडवर गुंगीकारक गोळ्यांचा साठा जप्त

### कन्नड शहर पोलिसांची धाडसी कारवाई ; आरोपी अटकेत, दुचाकीसह 76 हजारांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१८ मे - शहरातील बसस्टँड रोड परिसरात अवैधरित्या गुंगीकारक औषधांच्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या एका आरोपीला कन्नड शहर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीकडून Nitrazepam Tab. Nitrosun-10 या गुंगीकारक औषधांच्या ४१ गोळ्या, दुचाकी व मोबाईल असा एकूण सुमारे ७६ हजार ३४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई रविवारी (दि.१७) करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कन्नड शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी हद्दीत पेट्रोलिंग करत असताना बसस्टँड रोड परिसरात एक इसम गुंगीकारक औषधांच्या गोळ्यांची विक्री करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने सापळा रचून कारवाई करण्यात आली.

यावेळी महसूल विभाग, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी तसेच पंचांच्या उपस्थितीत छापा टाकण्यात आला. आरोपीची झडती घेतली असता त्याच्याकडून Nitrosun-10 या नावाच्या गुंगीकारक गोळ्यांची विविध पॅकेट आढळून आली. तसेच सुझुकी ॲक्सेस दुचाकी व विवो कंपनीचा अँड्रॉईड मोबाईल हस्तगत करण्यात आला.

या प्रकरणी निरजील मधुकर सुरे (वय २८, रा. नवजीवन कॉलनी, साने गुरुजी शाळेजवळ, कसबा, कन्नड) याला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडे सदर औषधे बाळगण्याबाबत कोणताही वैध परवाना अथवा वैद्यकीय प्रिस्क्रिप्शन आढळून आले नसल्याचे पोलिसांनी सांगितले. औषध निरीक्षकांनी प्राथमिक पडताळणीत या गोळ्या नशा निर्माण करणाऱ्या गुंगीकारक औषधांच्या श्रेणीत येत असल्याचे स्पष्ट केले.

याप्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १२३, NDPS Act 1985 अंतर्गत कलम ८(सी), २२(बी), २९ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीस न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून पुढील तपास पोलीस निरीक्षक आर. बी. सानप करीत आहेत.

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- 34/2026.

अर्जदारः- 1) मीराबाई भिका कायटे वय 60 वर्षे धंदा-शेती, 2) रविंद्र भिका कायटे ययः 42 वर्षे, धंदाः-शेती, 3) जितेंद्र भिका कायटे वयः 40 वर्षे, धंदाः- शेती, 4) प्रदीप निका कायटे वय 38 वर्षे धंदा-शेती वृीरल सर्व रा. पळसखेडा ता.सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

// विरुद्ध //

गैरअर्जदारः- निरंक

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे भिका हिरामन कायटे हे दि. 28/09/2022 ला मौजे पळसखेडा ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांकः 11/06/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- 08/05/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

**गा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 99/2026.

अर्जदार : - 1) सरूबाई प्रल्हाद पाटील, वयः 72 वर्षे, धंदाः शेती, रा. गिरठ ता. भडगांव जि. जळगांव, 2) नर्मदाबाई धनराज पाटील, वयः 75 वर्षे, धंदाः शेती, रा. निपाणे ता. एरंडोल जि. जळगांव. 3) सुगनबाई राजाराम पाटील, वयः 69 वर्षे, धंदाः शेती, रा. पुनगांव रोड, मल्हार नगर, पाचोरा ता. पाचोरा जि. जळगांव 4) लता शालीकराम पाटील, वयः 65 वर्षे, धंदाः शेती, रा. गोराडखेडा ता. पाचोरा जि. जळगांव. 5) मंजुळाबाई अरूण पाटील, ययः 63 वर्षे, धंदा शेती, रा. करमाड बु. ता. पारोळा जि. जळगांव, 6) चंद्रकला भगवान निकम (पाटिल), वय संभाजीनगर). 65 वर्षे, धंदा शेती. रा. निंभोरा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) 7) सुषमा कैलास पाटील, वयः- 46 वर्षे, धंदाः शेती, रा. गांधी चौक, गिरड ता. भडगांव जि. जळगांव 8) वर्षा भारत पाटील, वयः 44 वर्षे, धंदा शेती, रा, हिंगोणे सिग ता. चाळीसगांव जि. जळगांव. 9) गणेश भगवान निकग (पाटील), वयः 42 वर्षे, धंदाः- शेती, 10) आवणी गणेश निकम, वयः 16 वर्षे, धंदाः शिक्षण, अ. पा. क. अर्जदार नं. 9. 11) निखील गणेश निकम, वयः 18 वर्षे, धंदाः शिक्षण अर्जदार नं. 9 ते अर्जदार नं. 11 रा. निंभोरा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). 12) साकेत गणेश निकम, रायः 11 वर्षे, धंदाः शिक्षण, अ. पा. क. अर्जदार नं. 9. रा. गल्हार नगर, पाचोरा ता. पाचोरा जि. जळगांव.

// विरूध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतारा जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की. उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एरा. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), याच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे. रामभाऊ महारू पाटील हे दिनांक: 13/02/1997 ला मौजे निंभोरा ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांक:- 15/06/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :-08/05/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: 91/2026.

अर्जदारः- श्री. संदीप प्रभाकर सपकाळ, वयः 46 वर्षे, धंदाः शेती, रा. पिंपळवाडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरूध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे प्रभाकर साहेबराव सपकाळ हे दिनांक: 22/03/2026 ला मौजे बुलडाणा ता. व जि. बुलडाणा येथे उपचार घेत असतांना व जिजाबाई प्रभाकर सपकाळ हे दिनांकः-29/02/2021 ला मौजे पिंपळवाडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांकः 19/06/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा, अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः- 18/05/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

**जाहीर प्रगटन**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.:- 27/2026.

अर्जदार : 1) अनिल बापू गढरी, वयः 26 वर्षे, धंदाः- शेती 2) कमलेश बापू गढरी, वयः 30 वर्षे, धंदाः शेती, दोन्ही रा. मोहलाई ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद). 3) सीमा प्रविण गढरी, वयः 33 वर्षे, धंदाः शेती, रा. बदरखे ता. पाचोरा जि. जळगाव.

// विरुध्द //

गैरअर्जदारः- निरंक

अर्ज:- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे उषाबाई बापू गढरी ह्या दिनांकः 15/03/2015 ला मौजे मोहलाई ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), येथे मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा

अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे. (पुढील दिनांकः 18/06/2026).

तरी, ज्या कोणास अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन 30 दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः 18/05/2026 ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### पूर्णेत जनगणना अंतर्गत घर यादी व घर गणना अभियानास प्रारंभ

**पूर्णा,/ प्रतिनिधी-** भारत सरकारच्या जनगणना २०२७ कार्यक्रमांतर्गत घर यादी व घर गणना अभियानास जिल्हासह पूर्णा शहरात १६ मे २०२६ पासून प्रारंभ होत आहे. या अभियानातंर्गत प्रगणक व पर्यवेक्षक हे दिनांक १६ मे ते दिनांक १४ जुन २०२६ या कालावधीत प्रत्येक घरास भेट देऊन माहिती संकलीत करणार आहे, सदर घर यादी व घरगणना यशस्वी करण्यासाठी सर्व नागरिकानी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी यांनी केले आहे.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन सर्वसामान्यांमध्ये घबराट निर्माण करणारे : अजय गव्हाणे यांचा आरोप

**परभणी,/प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पेट्रोल-डिझेल या इंधनाच्या बचतीसह सोने खरेदी करु नका असे केलेले आवाहन हे सर्वसामान्य नागरीकात घबराट निर्माण करणारे ठरले आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे यांनी व्यक्त केले.

पेट्रोल-डिझेल या इंधनाच्या टंचाईवर सर्वार्थाने मात कशी करता येईल या दृष्टीने नियोजन करण्याऐवजी पंतप्रधान मोदी यांनी इंधन बचतीचा, दौऱ्यांवर निर्बंध टाकण्याचा दिलेला सल्ला पूर्णतः हास्यास्पद आहे. असे गव्हाणे यांनी नमूद करीत लग्नसराईसह अन्य सणासुदीच्या काळात ग्रामीण भागापासून शहरांमधून सोने खरेदी महत्वपूर्ण बाब ठरली असतांना सोनं खरेदी करु नका, या संबंधी केलेले आवाहन सर्वसामान्य नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणारे आहे, असे मत गव्हाणे यांनी व्यक्त केले.
राज्य व केंद्र सरकार हे सर्व आघाड्यांवर सपशेल अपयशी ठरले आहे, असाही आरोप गव्हाणे यांनी केला.

### गजानन नगरात धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त गजानन नगरातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक येथे गुरुवार १४ मे रोजी अभिवादन करण्यात आले. यावेळी छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कार्यक्रमात संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गजानन जोगदंड यांनी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जीवनकार्य, शौर्य, पराक्रम आणि स्वाभिमानी इतिहासावर सविस्तर प्रकाश टाकला. मराठा समन्वयक बालाजी मोहिते यांनी प्रस्ताविकातून कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बी. टी. पोळ होते. कार्यक्रमास दिलीप गिराम, पंडितराव शिंदे, सुभाष जाधव, रमेश देशमुख, डॉ. विजय बोंडे, गजानन घाडगे, सुनील जाधव, स्वामी आप्पा, रामेश्वर शिंदे, राजेश जाधव, बाळासाहेब चव्हाण, सुधाकर गायकवाड, बी. एम. जाधव सर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष गजानन जोगदंड, मराठा सेवा मंडळाचे अध्यक्ष नितीन देशमुख आणि मराठा समन्वयक बालाजी मोहिते यांनी केले होते. आभार प्रदर्शन नितीन देशमुख यांनी केले.

### परभणीत पुनर्विवाह जनजागृती अभियानाची तयारी सुरू : १५ मे ते २५ जूनदरम्यान जिल्हाभर जनजागृती; पुनर्विवाह नोंदणी व वधू-वर परिचय मेळाव्यांची माहिती देणार

**परभणी,/प्रतिनिधी :** मराठा प्रवाह समन्वय समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुनर्विवाह जनजागृती अभियानाच्या नियोजनासाठी जिल्हा कार्यकारिणीची बैठक परभणी येथे उत्साहात पार पडली. १५ मे २०२६ ते २५ जून २०२६ या कालावधीत परभणी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये शहरासह ग्रामीण भागात व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविणाऱ्या मराठा प्रवाह समन्वय समितीच्या माध्यमातून हे अभियान हाती घेण्यात आले आहे. येथील विभागीय कार्यालयात आयोजित बैठकीत अभियानाची रूपरेषा जाहीर करण्यात आली. यावेळी धाराजी भुसारे यांनी अभियानाविषयी सविस्तर माहिती दिली. जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागात पुनर्विवाहाची गरज, पुनर्विवाह नोंदणी प्रक्रिया तसेच पुनर्विवाह वधू-वर परिचय मेळाव्यांबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. पुनर्विवाह नोंदणी विनामूल्य करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

बैठकीत तालुका कार्यकारिणीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या-आपल्या तालुक्यात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांच्या नियोजनाबाबत मनोगत व्यक्त केले. या अभियानात सहभागी होण्यासाठी अथवा पुनर्विवाह नोंदणीसाठी मराठा प्रवाह समन्वय समिती कार्यालय, जिल्हा विशेष लेखा परीक्षण कार्यालयासमोर, शिवाजीनगर, परभणी येथे संपर्क साधावा किंवा ९८२३१२५२२७, ८००७५८६१०२, ८६९८३८९०५४ या क्रमांकांवर संपर्क करण्याचे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### जिंतूर-सेलू विधानसभा प्रमुखपदी राम नाना पाटील यांची निवड

**जिंतूर,/प्रतिनिधी :** शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या जिंतूर-सेलू विधानसभा प्रमुखपदी राम नाना पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या वतीने ही निवड जाहीर करण्यात आली. यासोबतच जिंतूर तालुकाप्रमुखपदी किरण देशमुख, उपजिल्हाप्रमुखपदी भारतराव पवार, तालुकाप्रमुखपदी रितेश पांडे, शहरप्रमुखपदी अरविंद कटारे तसेच शहर संघटकपदी कांतराव धानोरकर यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

राम नाना पाटील यांचा जिंतूर व सेलू तालुक्यात मोठा जनसंपर्क असून पक्षवाढीसाठी ते सातत्याने कार्यरत असल्याने पक्ष नेतृत्वाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे. निवडीची घोषणा होताच जिंतूर व सेलू तालुक्यातील शिवसैनिक आणि समर्थकांनी ढोल-ताशांच्या गजरात तसेच फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोषात स्वागत केले.

यावेळी बोलताना राम नाना पाटील यांनी, आपण गेल्या अनेक दिवसांपासून शिवसेना पक्षाचे काम करत असून आगामी काळातही पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी जोमाने कार्य करणार आहे, असे सांगितले. या सर्व नियुक्त्यांमुळे जिंतूर व सेलू तालुक्यात शिवसेनेला बळ मिळणार असल्याचा विश्वास कार्यकर्ते व नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे.

# महामार्गावर स्पीडब्रेकर टाकून एसपी ऑफीस केले सेफ : परंतु दत्तधामपर्यंतचा वसमत रस्ता व विसावा चौकापर्यंतचा जिंतूर रस्ता मृत्यूचा सापळा बनूनसुध्दा केला दुर्लक्षित

**परभणी ,/प्रतिनिधी:-** पोलिसांची हुशारी : महामार्गावर स्पीडब्रेकर टाकून एसपी ऑफीस केले सेफ : परंतु दत्तधामपर्यंतचा वसमत रस्ता व विसावा चौकापर्यंतचा जिंतूर रस्ता मृत्यूचा सापळा बनूनसुध्दा केला दुर्लक्षित केला आहे.

महानगराच्या मध्यवस्तीतून जाणाऱ्या वसमत व जिंतूर हे दोन्ही महामार्ग पादचाऱ्यांसह वाहनधारकांच्या दृष्टीने अक्षरशः मृत्यूचे सापळे बनले आहेत. परंतु, या दोन्ही महामार्गावरील वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी कायमस्वरुपी व ठोस उपाययोजना अवलंबविण्याऐवजी शहर वाहतूक पोलिस यंत्रणेसह अन्य वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी केवळ एसपी साहेबांची मर्जी राखण्याकरीता पोलिस अधिक्षक कार्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर दोन ठिकाणी स्पीड ब्रेकर अंथरुन आपली कर्तव्यदक्षता व तत्परता दाखवली.

महानगरांतर्गत वसमत व जिंतूर हे दोन्ही रस्ते गेल्या कित्येक वर्षांपासून वाहतूकीच्या दृष्टीने अक्षरशः धोकादायक बनले आहेत. त्याची मूळ कारणेसुध्दा स्पष्ट आहेत. मूळात या दोन्ही महामार्गावरील एकेरी वाहतूक करणारे रस्ते अक्षरशः अरुंद आहेत. या एकेरी रस्त्यावरुन दोन चारचाकी वाहनेसुध्दा एकमेकांना ओव्हरटेक करु शकत नाहीत. या अरुंद रस्त्यावरुन जड वाहनांना ओव्हरटेकर करुन पुढे सरकने म्हणजे अक्षरशः मृत्यूला सामोरे जाण्यासारखेच आहे. त्यातच या दोन्ही अरुंद असणाऱ्या महामार्गावर दोन्ही बाजूंनी काही मालमत्ताधारकांनी बांधकामे करतेवेळी सर्व नियम, अटी व शर्ती नेहमीप्रमाणे खुंटीला टांगल्या, टोलेजंग संकुले, इमारती उभ्या केल्या. पार्कींग वगैरे गोष्टी धाब्यावर बसविल्या. त्यात पुन्हा व्यापाऱ्यांनी बेसुमार अतिक्रमणे करीत अगदी रस्त्यापर्यंत आपले बस्तान बसविले. तर त्यापुढे फुटपाथासह भर रस्त्यावरसुध्दा छोट्या मोठ्या हॉटेलधारकांसह पान टपऱ्या, भाजीपाला व फळ विक्रेत्यांनी मोक्याच्या व वर्दळीच्या भागातील जागा पटकावून ठाण मांडले. त्यामुळे अरुंद असणारा दुतर्फा एकेरी मार्ग अधिकच अरुंद झाला. अन् वाहनधारकांच्या दृष्टीने तो जीवघेणा ठरला.

या दोन्ही महामार्गावर लांबपर्यंत वसाहती स्थिरावल्या आहेत. त्याबरोबरच मोठ मोठी दुकाने, शोरुम, एजन्सीज व मोठ मोठे हॉटेल्स रस्त्यापर्यंत भिडले आहेत. त्यातच शासकीय, निमशासकीय कार्यालये, बँका, खाजगी वित्तीय संस्था, पेट्रोलपंप, हॉस्पिटल्स, शाळा, महाविद्यालय, मंदिरे वगैरे वर्दळीची ठिकाणे रस्त्यालगत आहेत. त्यामुळे दोन्ही महामार्ग पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत अक्षरशः वर्दळीचे बनले आहेत. शहराच्या चोहोबाजूंनी एकही बायपास रस्ता नाही. त्यामुळे बाहेरील जड वाहतूक मध्यवस्तीतूनच खूलेआमपणे सुरु आहे. त्याचा परिणाम अरुंद असणाऱ्या या रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड असा ताण आला आहे. त्याचा परिणाम शहर वाहतूक पूर्णतः कोलमडली आहे. छोटे मोठे अपघात नित्याचेच बनले आहेत. या अपघातांमधून शेकडोंचे बळी गेले आहेत. हजारो जायबंदी झाले आहेत. अपघातांच्या मालिकांना खंडच नाही. परंतु, महानगरपालिकेसह साखरझोपेतील शहर वाहतूक पोलिस यंत्रणेसह वरिष्ठ पोलिस अधिकारी व अन्य विभागांना त्याचे काहीही सोयरसुतक नाही. खासदार-आमदारांसह महापालिका पदाधिकारी व सदस्यांना वाहतूकीच्या कोंडीसह त्यासाठीच्या कायमस्वरुपी ठोस उपाययोजनेच्या प्रश्नांबाबत फारसे स्वारस्य नाही. तो प्रश्नच नाही, या अविर्भावात हे लोकप्रतिनिधी आजपर्यंत वावरत आले आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून सर्वसामान्यांनी कधीच अपेक्षाही व्यक्त केल्या नाहीत. त्याचा परिणाम वसमत व जिंतूर हे दोन्ही महामार्ग अक्षरशः बेवारस बनले आहेत.

## एकीकडे इंधन बचतीचा संदेश तर दुसरीकडे एसटीची दीड कि.मी.फेऱ्यांची सक्ती

**परभणी./प्रतिनिधी:** जिल्हा मुख्यालय स्थानच्या परभणी बसपोर्टसमोरच्या रस्त्यावर सातत्याने होणाऱ्या वाहतूकीच्या कोंडीसह वाद-विवादांच्या पार्श्वभूमीवर जिंतूर, मानवत, पाथरी व गंगाखेडकडे जाणाऱ्या बसेसला विरुध्द दिशेने म्हणजे रेल्वेस्टेशन मार्गे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरास वळसा घालून एकेरी मार्गे परतीचा परिवहन महामंडळासह शहर वाहतूक पोलिस यंत्रणेने अवलंबविलेला नवा फंडा एसटी बसेसला नाहक दीड किलो मीटर अंतराच्या फेऱ्यांसह इंधन व वेळ खर्ची घालण्यास कारणीभूत ठरत आहे.

परभणी बसपोर्टच्या समोरील रस्त्यावर म्हणजे महामार्गावर गेल्या कित्येक वर्षांपासून वाहतूकीचे अक्षरशः तीनतेरा वाजले आहेत. त्याचे मूळ कारण अगदी स्पष्ट आहे. परंतु, त्या कारणांकडे यंत्रणांनी कधीच गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळे कारणांच्या मूळावर कधीच घाव घातला गेला नाही. त्याचा परिणाम बसपोर्टसमोरील दोन्ही एकेरी मार्ग हे कायमस्वरुपी वाहतूकीच्या दृष्टीने डोकेदुखीचा विषय ठरला आहे.

बसस्थानकासमोर व लगत छोट्या-मोठ्या विक्रेत्यांसह व्यापाऱ्यांनी केलेल्या बेसुमार अतिक्रमणांसह भर व वर्दळीच्या या रस्त्यावरच पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत बेशिस्तपणे उभे राहणाऱ्या दुचाकी, तीनचाकी व चारचाकी वाहनांच्या अभूतपुर्व गर्दीमुळेच वाहतूकी कोलमडत आहे. वाहतूकीची कोंडी त्यातून दररोज वाहनधारकांमध्ये वाद-विवादासह हमरीतुमरीच्या घटना व शहर वाहतूक पोलिस यंत्रणेच्या कर्मचाऱ्यांद्वारे सोयीचे मौन या गोष्टी नित्याच्या ठरल्या आहेत. त्याचा परिणाम, कहर म्हणजे या अतिक्रमणकर्त्यांसह बेशिस्तपणे वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांनी आता बसपोर्टच्या दोन्ही प्रवेशद्वारावर एसटी बसेसनासुध्दा ये-जा करण्यास पध्दतशीरपणे अडथळे उभे करीत मज्जाव करण्याचे प्रकारसुध्दा सुरु केले आहेत. एसटी बसेसला बसपोर्टमध्ये ये-जा करतांना भर रस्त्यावर थोपविण्याचा व स्वतः ची वाहने पुढे काढण्याचे हे प्रकार वाद-विवाद, शिवीगाळ व हमरीतुमरीवर येत आहेत. त्यातून बस चालकासह वाहकास धक्काबुक्कीसह मारहाणीचे प्रकारसुध्दा घडले आहेत.

दररोजच्या या वाहतूकीच्या कोंडीवर शहर वाहतूक पोलिस यंत्रणेसह परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून कायमस्वरुपी उपाययोजना अवलंबविल्या जातील, असे अपेक्षित होते. दुर्देवाने या दोन्ही यंत्रणांनी त्या विषयाकडे कधीच गांभीर्याने पाहिले नाही. त्यामुळे या परिसरात काहींचे नाहक बळी तर काही कायमस्वरुपी जायबंदी झाले आहेत. परंतु, साखरझोपेतील या दोन्ही यंत्रणांना जाग आली नाही, हे दुर्देव आहे. अलिकडे या दोन्ही यंत्रणांनी सातत्याने होणाऱ्या टीकेच्या पार्श्वभूमीवर एक नवीनच युक्ती शोधून काढली. त्या बाबीची अंमलबजावनीसुध्दा सुरु केली. ती म्हणजे बसपोर्टवरुन बाहेर पडणाऱ्या जिंतूर, मानवत, पाथरी व गंगाखेडकडे जाणाऱ्या बसेसला डाव्या बाजूने म्हणजे एकेरी बाजूने रेल्वेस्टेशन, तेथून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरास वळसा घालून पुन्हा बसपोर्टसमोरुन एकेरी मार्गे बाहेर काढण्याची अफलातून कल्पना मांडली अन् साकारली. परंतु, या नव्या फंड्यामुळे वाहतूकीच्या दररोजच्या कोंडीवर फारसा फरक पडला नाही.

## परभणीत तलवारीसह युवक ताब्यात; कोतवाली पोलिसांची कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी गस्तीदरम्यान केलेल्या कारवाईत एका युवकाकडून दोन तलवारी जप्त करण्यात आल्या. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ मे २०२६ रोजी परभणी शहरात गस्त घालत असताना गुप्त बातमीदारामार्फत साखला प्लॉट परिसरातील एका घरात तलवारी असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिस पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. यावेळी कृष्णा सिंग साहेबसिंग टाक (वय २०, रा. साखला प्लॉट, परभणी) याच्या घराची झडती घेतली असता दोन तलवारी आढळून आल्या. जप्त करण्यात आलेल्या तलवारींची किंमत सुमारे दोन हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २३०/२०२६ नोंद करण्यात आला असून भारतीय दंड संहितेअंतर्गत तसेच शस्त्र कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जीवन बेनिवाल यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत विवेकानंद पाटील, सपोनि जायभाय, पोलीस अंमलदार मधुकर चट्टे, सुग्रीव केंद्रे, निलेश भुजबळ, जमीर फारुकी, उमर सय्यद, सूर्यकांत फड, रफियोद्दीन शेख व हणवते यांनी सहभाग घेतला.

## धानोरा बु येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन



**जिंतूर,/प्रतिनिधी:** आज दिनांक १५ मे २०२६ रोजी जिंतूर तालुक्यातील वाघी धानोरा मंडळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन तहसील कार्यालय जिंतूर धानोरा बु ता जिंतूर या ठिकाणी करण्यात आले. या शिबिरासाठी उपविभागीय अधिकारी सेलू शैलेश लाहोटी, तहसीलदार जिंतूर श्रीमती शीतल कच्छवे, , जिंतूर पंचायत समिति सभापती किशोर खिस्ते जिल्हा परिषद सदस्य भगवानराव वटाणे गव्हर्नमेंटकॉन्टॅक्टर कैलास भाऊ खंदारे, , नायब तहसीलदार प्रशांत राखे जिंतूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक गजानन वराड संतोष राव मोरे चेअरमन मोहन खंदारे, सर्व विभागाचे विभाग प्रमुख व कर्मचारी उपस्थित होते.
छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजनातून प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न तालुका प्रशासनाकडून करण्यात आला. या शिबिरामध्ये सर्वसामान्य नागरिकांना विविध शासकीय योजना संदर्भात माहिती देण्यात आली. तसेच सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्यात आल्या. प्रलंबित फेरफार, सातबारा, आकृषिक प्रमाणपत्र, तुकडेबंदी संदर्भातील समस्या, कृषी विभागाच्या विविध समस्या याबाबत निपटारा करण्याचा आमचा मानस असल्याबाबत प्रास्ताविकात तहसीलदार शितल कच्छवे यांनी तर अध्यक्षीय समारोपात उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी प्रतिपादन केले. उपस्थित नागरिकांना उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, सातबारा, फेरफार यासारख्या विविध प्रमाणपत्राचे व दाखल्यांचे वाटप करण्यात आले. चांगले कार्य करणाऱ्या विविध महिला बचत गटांचा सन्मान करण्यात आला. संपूर्ण शिबिराचे शिस्तबद्ध आयोजन, नियोजन तहसील कार्यालय जिंतूर . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आवल कारकून श्री होळंबे यांनी केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी महसूल चे सर्व कर्मचारी, यांच्यासह सर्व , तलाठी, सर्व महसूल सेवक यांनी मेहनत घेतली.

## मान्सूनपूर्व आढावा बैठक २०२६, आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशासन सज्ज

**जिंतूर/प्रतिनिधी:** आगामी मान्सून काळात उद्भवू शकणाऱ्या नैसर्गिक आपत्ती, पूरस्थिती, वादळी वारे, अतिवृष्टी तसेच इतर आपत्कालीन परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. याच अनुषंगाने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी मा. उपविभागीय अधिकारी सेलू श्री. शैलेश लाहोटी यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक जिंतूर तहसील कार्यालयात आयोजित करण्यात आली.

या बैठकीत विविध विभागांतील अधिकारी उपस्थित राहून मान्सूनपूर्व उपाययोजनांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस तहसीलदार जिंतूर, नायब तहसीलदार महसूल, पोलीस निरीक्षक जिंतूर व बोरी, मुख्याधिकारी नगर परिषद जिंतूर, गट विकास अधिकारी पंचायत समिती जिंतूर, तालुका आरोग्य अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान मा. उपविभागीय अधिकारी यांनी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ११, २२ ते २४ आणि कलम ३८ अंतर्गत मान्सूनपूर्व तयारीची जबाबदारी प्रत्येक विभागाने गांभीर्याने पार पाडण्याच्या सूचना दिल्या. आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपाययोजना राबविणे, विभागांमध्ये समन्वय ठेवणे तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी ग्रामस्तरावरील अधिकारी व कर्मचारी जसे ग्रामविकास अधिकारी, कृषी सहाय्यक, ग्राम महसूल अधिकारी आदींनी मुख्यालयी उपस्थित राहून आपले संपर्क क्रमांक सतत सुरू ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. मान्सून काळात नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी सर्व विभागांनी सतर्क राहून समन्वयाने कार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. तसेच आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात नेमून दिलेल्या कामात दुर्लक्ष, टाळाटाळ अथवा निष्काळजीपणा करणाऱ्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांवर आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील प्रकरण १०, कलम ५६ अन्वये कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला. संबंधितांवर एक वर्षापर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही प्रकारची कारवाई प्रस्तावित करण्यात येऊ शकते, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

# घरकुल योजना ही सर्वसामान्यांच्या हक्काची- खिस्ते

**जिंतूर,/प्रतिनिधी:** पंचायत समिती येथे विविध योजना तसेच घरकुल योजना याविषयी पंचायत समिति सभागृहामध्ये सर्व सदस्य व अधिकारी यांची आढावा बैठक संपन्न झाली या बैठकीमध्ये सभापती आयोध्या ताई किशोर खिस्ते व उपसभापती सोनीताई माधव दराडे यांनी घरकुल योजनेअंतर्गत यशवंतराव आवास घरकुल योजना पंतप्रधान आवास रमाई आवासघरकुल योजना शबरी घरकुल योजना शेतकऱ्यांसाठी सिंचन विहीर व नरेगा योजना यासारख्या अनेक योजनेची आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीमध्ये ग्रामीण भागातील गोरगरिबांचे घरकुल योजना ही योग्य रीतीने अंमलबजावणी व्हावी यासाठी भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी भाई व महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई साकोरे बोर्डीकरयांनी शेवटच्या नागरिकांपर्यंत घरकुल योजना पोहोचावे यासाठी जास्तीत जास्त लाभ नागरिकांना द्यावा अशी



आव्हान त्यांनी केले आहे तसेच आढावा बैठकीमध्ये कितीमंजूर घरकुलांची एकूण संख्या किती आहे सुरू असलेले व अपूर्ण घरकुल किती लाभार्थीने काम सुरू न करण्याची कारणे पहिला व दुसरा तिसरा हप्ता किती लाभार्थींना मिळाला याची स्थिती घरकुल बांधकामाची गुणवत्ता तपासणी जिओ टॅगिंग व ऑनलाईन यादी अद्याप आहेत का अपात्र व प्रलंबित प्रकरणाचा आढावा वेळेत काम पूर्ण न करणाऱ्या लाभार्थीवर कारवाई ग्रामपंचायत अधिकारी नियमित प्रत्यक्ष कृती घेण्याबाबत सूचना शासनाने दिलेली उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्याची निदेश अशा सूचना यावेळी सभापती सो आयोध्या ताई खिस्तेव सोनी ताई दराडे उपसभापती आणि सर्व सन्माननीय सदस्य यांनी केले आहे तसेच शेतकऱ्यांना सिंचन विहिरीचा नरेगा या योजनेचा लाभ त्वरित देण्यात यावा अशा सूचना सुद्धा त्यांनी यावेळी देण्यात आले आहेत या बैठकीला तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी व सर्व सन्माननीय पंचायत समिति सदस्य पंचायत समितीचे गटविकास अधिकारीसुभाष मानकर हे सुद्धा उपस्थित होते गेल्या अनेक दिवसापासून पंचायत समितीवर प्रशासकीय राज असल्यामुळे कर्मचाऱ्यांची मनमानी होती परंतु पंचायत समितीवर सभापती उपसभापती यांची निवड होताचयांनी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना अशा सूचना देण्यात आल्याशेवटच्या नागरिकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवण्यात यासाठी अयोध्याताई खिस्ते व सोनी ताईमाधव दराडे यांचे प्रयत्न चालू आहेत

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गेवराई नगर परिषदेचे कंत्राटी कामगार शहराचा कणा, किमान वेतन कष्टकरी कामगारांचा मूलभूत हक्कच : बाळराजे पवार



गेवराई दि. 16 : वार्ताहर : गेवराई शहराच्या सर्वांगीण विकासात

पाणी आणि स्वच्छता हे महत्वाचे घटक असून, कंत्राटी सफाई कामगार शहरातील स्वच्छतेचा कणा आहे. त्यांच्यामुळेच शहरातील घाण साफ होते. सगळेच कामगार इमानेइतबारे काम करून, शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. म्हणूनच, किमान वेतन अधिनियमानुसार त्यांना पगार देण्याचा निर्णय घेतला. आम्ही कामगारांवर उपकार केले नाहीत. गोरगरीब कामगारांच्या सुखदुःखात आम्ही कायम सोबत आहोत. तुम्ही प्रामाणीकपणे काम करा, तुमच्यावर कधीच अन्याय होऊ देणार नाही. अशी भावना भारतीय जनता पक्षाचे नेते बाळराजे पवार यांनी येथे बोलताना व्यक्त केली आहे.

गेवराई नगर परिषदेच्या कंत्राटी कामगारांच्या वतीने, शनिवार ता. 16 मे रोजी सकाळी अकरा वाजता भारतीय जनता पक्ष कार्यालयात

आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर नप उपाध्यक्ष ॲड. घुंबार्डे जिजा, गटनेते ॲड राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी सरपंच दिलीप मोरे मामा, सभापती महेश सौंदरमल, सभापती बद्दुशेठ, नगरसेवक अप्पासाहेब कानगुडे, नगरसेवक राजेश टाक, माजी सभापती जिजा खंडागळे, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी नगरसेवक भरत गायकवाड यांची उपस्थिती होती.

गेवराई नगर परिषदेच्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन अधिनियमानुसार पगार देण्याची मागणी भारतीय जनता पक्षाच्या वतीने बाळराजे पवार यांनी नप प्रशासनाकडे करण्यात आली होती. नगर परिषदेवर सत्ता स्थापन होताच, पवार यांनी कामगार वेतनाच्या संदर्भात पाठपुरावा केल्याने, गेल्या काही महिन्यांपासून नपच्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन दिले जात आहे. कामगारांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. कामगारांच्या वतीने शनिवार ता. 16 रोजी बाळराजे पवार यांचा जाहीर सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. महिला कामगारांनी पवारांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. पाणी पुरवठा, घंटा गाडी, स्वच्छता विभागाच्या

कामगारांनी पवार यांचे स्वागत करून आनंद व्यक्त केला.

यावेळी बोलताना पवार म्हणाले की, गेवराई चे कामगार शहराचे भूमिपुत्र आहेत. त्यांच्याच बळावर शहरातील स्वच्छता मोहीम यशस्वी होऊ शकली. ते इमानदारी काम करत आलेत. त्यामुळे त्यांच्या घामाचा मोबदला म्हणून त्यांच्यासाठी किमान वेतनाचा विषय लावून धरला होता. त्याला यश आले असून, कामगारांच्या हक्कासाठी झटणारी, गेवराई नगर परिषद ही, मराठवाड्यातली पहिली नगरपालिका असणार आहे. ही बाब मनाला समाधान देणारी आहे. पाणी आणि स्वच्छता हे महत्वाचे स्वच्छता दूत असून, कंत्राटी सफाई कामगार शहरातील स्वच्छतेचा कणा आहेत. त्यांच्यामुळेच शहरातील घाण साफ होते. सगळे कामगार इमानेइतबारे काम करून, शहरातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत आहेत. याचा आनंद असून, त्यांना त्या कामाचा मोबदला मिळालाच पाहिजे. यापुढे ही, त्यांचे हित लक्षात घेऊन नपचे नगराध्यक्ष,

नगरसेवक काम करतील.

तुम्ही कुठेही कमी पडू नका, आम्ही तुमच्या पाठीशी आहोत. अशी अपेक्षा भाजपा नेते बाळराजे पवार यांनी शेवटी बोलताना व्यक्त केली. यावेळी ॲड. राजेंद्र राक्षसभुवनकर, महेश सौंदरमल यांची भाषणे झाली. यावेळी मुन्ना शेठ, विष्णुपंत आतकरे, भरतजी गायकवाड, कृष्णा भैया पाटोळे ,आखेब काझी, फाहाद चाऊस , जावेद पठाण ,शौकत पठाण संतोष राठोड, राजू पठाण, राम चोरमले,गणेश सुरडकर संजय आंधळे , श्रीराम घाटूळ, मुजायद टेलर , उमेश साकळे, लक्ष्मण चव्हाण, यांच्यासह नगर परिषदेचे कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुभाष सुतार यांनी केले. आभार माजी नगरसेवक भरत गायकवाड यांनी मानले.

### परळीतील अत्याधुनिक भाजी मंडई उभारण्यासाठी न.प. पदाधिकाऱ्यांकडून पहाणी

# सर्व सुविधांनी युक्त नव्या भाजी मंडई उभारणी कामाला नोव्हेंबरपासून प्रारंभ - बाजीराव भैय्या धर्माधिकारी



**परळी वैजनाथ** | प्रतिनिधी

परळी नगर परिषदेच्या गणेशपार भागातील भाजी मंडई इमारत अत्यंत जीर्ण झालेली आहे.ही जीर्ण इमारत पाडून त्या ठिकाणी ना.पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक व सर्व सुविधांनी युक्त नव्या भाजी मंडई इमारतीची उभारणी करण्यात येणार आहे. सर्व सुविधांनी युक्त नवीन भाजी मंडई उभारणी कामाला नोव्हेंबरपासून प्रारंभ करण्याचा प्रयत्न असुन त्याद्दष्टीने पहाणी, व्यावसायिक,व्यापारी व शेतकऱ्यांशी संवाद साधल्याची माहिती माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिली.

माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व न.प. पदाधिकारी यांनी भाजी मार्केट परिसराला भेट देऊन व्यापारी, आडते व शेतकरी बांधवांशी संवाद साधला. अनेक वर्षांपासून या भाजी मार्केटची इमारत धोकादायक अवस्थेत असून, विशेषतः पावसाळ्यात व्यापारी, शेतकरी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याची बाब यावेळी समोर आली. या पार्श्वभूमीवर नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. धोकादायक ठरलेल्या या जुन्या इमारतीच्या पाडकामाची कार्यवाही लवकरच हाती घेण्यात येणार आहे.

राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे व ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नोव्हेंबर महिन्यापासून नव्या भाजी मार्केटच्या बांधकामास प्रारंभ होणार आहे. नवीन बाजारपेठेमध्ये व्यापाऱ्यांसाठी सुसज्ज गाळे, कॅन्टीन, शेतकरी बांधवांसाठी निवारा शेड, आधुनिक शौचालय व्यवस्था, पाण्याची टाकी, अंतर्गत रस्ते, पथदिवे, संरक्षण भिंत यासह विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. परळी शहराच्या व्यापारी व कृषी अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असलेल्या या बाजारपेठेला नवसंजीवनी देण्याचा नगर परिषदेचा प्रयत्न असून, व्यापारी, शेतकरी आणि ग्राहकांसाठी सुरक्षित, स्वच्छ व आधुनिक बाजारपेठ उभारण्याचा संकल्प असल्याचे बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी स्पष्ट केले. यावेळी न.प. गटनेते वैजनाथ सोळंके, अंगद माळी, नगर अभियंता ढवळे, नगर रचना विभागाचे यम्मलवाड यांच्यासह व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त नायगावात भव्य रक्तदान शिबिर ; 26 रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग

केज/प्रतिनिधी : तालुक्यातील नायगाव येथे संघर्ष युवा ग्रूपच्या माध्यमातून राहुल खोडसे यांच्या पुढाकाराने छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर उत्साहात संपन्न झाले. हनुमान मंदिर परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरास युवक, नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

“रक्तदान हेच श्रेष्ठ दान” या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात एकूण 26 रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश दिला. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि युवकांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

विशेष म्हणजे, संघर्ष युवा ग्रूपच्या माध्यमातून राहुल खोडसे यांच्या पुढाकाराने मागील आठ वर्षांपासून सातत्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले जात असून हा स्तुत्य उपक्रम कायम सुरू आहे. सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबविणाऱ्या संघर्ष युवा ग्रूपच्या कार्याचे ग्रामस्थांकडून कौतुक व्यक्त करण्यात येत आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त केवळ अभिवादन न करता मानवसेवेच्या माध्यमातून समाजाप्रती कर्तव्य जपण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी उमेश खोडसे, शशिकांत खोडसे, मुकुंद माचवे, अमोल खोडसे, धम्मपाल होके, नितीन खोडसे, शुभम गुजर,सुरेश खोडसे,अशोक महामुनी,भारत बिटले,पवन खरात,कमलाकर चव्हाण,समाधान खोडसे,प्रवीण खोडसे,विशाल खोडसे,पत्रकार दत्ता मुजमुले सह पदाधिकारी उपस्थित होते शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी अंबाजोगाई येथिल स्वरातीच्या सर्व डॉ टीमने सहकार्य केले.

# अंबाजोगाई बस स्थानकात प्रवाशांना बसण्यासाठी तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करा; समाजवादी पार्टीचे आगार व्यवस्थापकांना निवेदन

अंबाजोगाई : शहरातील एसटी बस स्थानकात प्रवाशांना बसण्यासाठी असणारे बाकडे व प्लॅटफॉर्म यात खूप अंतर असल्यामुळे प्रवासी, वयोवृद्ध लोकांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच उन्हाळ्याच्या झळा तीव्र होत आहेत. अशा वेळी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही करण्यात यावी बाबत अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ऍड.शिवाजी कांबळे, अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी शनिवार, दिनांक १६ मे रोजी आगार व्यवस्थापक, अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



आगार व्यवस्थापक, अंबाजोगाई यांना निवेदन दिल्यानंतर यासंदर्भात आमच्या प्रतिनिधीशी बोलताना समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव ऍड.शिवाजी कांबळे, अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी सांगितले की, अंबाजोगाई येथे काही महिन्यांपूर्वीच बस स्टॅन्डचे नवीन बांधकाम झालेले आहे. प्रवाशांना प्लॅटफॉर्म नजीक बसण्यासाठी म्हणावी तशी व्यवस्था नाही. प्लॅटफॉर्मपासून ते बसण्यासाठी केलेल्या बाकड्यांपर्यंत मध्ये खूप अंतर आहे. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. विशेषतः वृध्द, दिव्यांग, गरोदर स्त्रिया आणि लहान मुलं असलेल्या प्रवशांना यामुळे खूप त्रास होत आहे. तसेच अंबाजोगाई येथे योगेश्वरी देवीचे देवस्थान मोठे आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मंदिराला येणारे भाविक बाहेरगावाहून येत असतात. म्हणून बस स्थानकात सध्या असलेल्या बाकड्यांपासून ते प्लॅटफॉर्म पर्यंत प्रवशांना बसण्यासाठी नवीन बाकड्यांची व पिण्याच्या पाण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करण्यात यावी. समाजवादी पार्टी तर्फे अंबाजोगाई आगार व्यवस्थापक यांना निवेदन देण्यात येत आहे. तरी सदरील निवेदनाची तात्काळ दखल घेऊन प्रवाशांची बसण्याची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. अन्यथा समाजवादी पार्टीच्या वतीने अंबाजोगाई बस स्थानकासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल याची आपण नोंद घ्यावी. तसेच आंदोलनादरम्यान काही अनुचित प्रकार घडला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी ही अंबाजोगाई आगार व्यवस्थापक यांची राहील. म्हणून तात्काळ आपण उपाययोजना कराव्यात अशी मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश सचिव तथा चर्मकार सेलचे प्रदेशाध्यक्ष ऍड.शिवाजी कांबळे आणि अंबाजोगाई शहराध्यक्ष राजेश परदेशी यांनी प्रशासनाकडे केली आहे. निवेदनाच्या प्रति माहितीस्तव महाराष्ट्राचे परिवहन मंत्री ना.प्रतापराव सरनाईक, अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई आणि जिल्हाधिकारी, बीड यांना देण्यात आलेल्या आहेत. सदरचे निवेदन देताना समाजवादी पार्टीच्या महिला जिल्हाध्यक्ष शेख सालेहा, तालुकाध्यक्ष शेख जिलानी, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अधिकमास : पहिल्या सोमवारी ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी



परळी वैजनाथ : अधिक मासातील (पुरुषोत्तम मास) पहिल्या सोमवारी श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असणाऱ्या पंचम ज्योतिर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी राज्यासह देशाच्या विविध भागांतून आलेल्या शिवभक्तांनी मोठी गर्दी केली. सकाळपासूनच मंदिर परिसरात भक्तांच्या रांगा लागल्याचे दिसून आले. “हर हर महादेव”, “हर हर भोलेनाथ”च्या जयघोषाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिमय झाला होता. अधिक मासातील पहिल्या सोमवार निमित्त देशाच्या विविध भागातून आलेल्या हजारो भाविकांनी प्रभू वैद्यनाथाची मनोभावे पूजा अर्चा करत दर्शन घेतले .

दर तीन वर्षांनी एकदा येणाऱ्या पुरुषोत्तम मासाला हिंदू धर्मामध्ये विशेष तथा अनन्य साधारण धार्मिक महत्त्व असल्याने या काळात प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी मांदियाळी पाहावयास मिळाली. अधिक मासातील पहिल्या सोमवारी दर्शन घेण्यासाठी अनेक भक्तांनी उपवास, अभिषेक, पूजा-अर्चा करत भगवान शंकराची मनोभावे आराधना देखील केली.

श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे महाराष्ट्रा, तेलंगणा, कर्नाटक, मध्यप्रदेशसह देशाच्या विविध राज्यांतूनही मोठ्या संख्येने भाविक दाखल होतात. मंदिर प्रशासनाच्या वतीने दर्शनासाठी व्यवस्थित नियोजन करण्यात आले होते. भाविकांच्या सोयीसाठी सुरक्षा व्यवस्था तसेच इतर सुविधा व रांग व्यवस्थापन करण्यात आले होते.

अधिक मासातील पहिल्या सोमवारी प्रभू वैद्यनाथाच्या चरणी नतमस्तक होत भक्तांनी कुटुंबाच्या आरोग्यासाठी तसेच सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. दिवसभर मंदिर परिसरात धार्मिक तथा भक्तीमय वातावरण अनुभवायला मिळाले.

# मिशन एड्स सुरक्षा अंतर्गत मोहा येथे एचआयव्ही जनजागृती व तपासणी शिबिर संपन्न

परळी वैजनाथ, (प्रतिनिधी) : जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष, जिल्हा रुग्णालय बीड तथा उपजिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली मिशन एड्स सुरक्षा अभियानांतर्गत मोहा गावात एचआयव्ही एड्स जनजागृती व तपासणी शिबिर उत्साहात पार पडले.



दि. १३ मे २०२६ रोजी मोहा येथील बसस्थानक परिसरात आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे आयोजन आयसीटीसी विभाग व लिंक वर्कर प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

शिबिराच्या प्रारंभी समुपदेशक श्री. शरद चव्हाण यांनी उपस्थित नागरिकांना एचआयव्ही, एड्स, टीबी तसेच गुप्तरोग यांविषयी सविस्तर माहिती देत जनजागृती केली. तसेच प्रत्येकाने वेळोवेळी एचआयव्ही तपासणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री. अमोल गालफडे यांनी उपस्थितांची एचआयव्ही तपासणी केली. या शिबिरात एकूण ५० नागरिकांनी तपासणी करून घेत आरोग्याबाबत जागरूकता दाखवली.

ग्रामीण भागात अशा प्रकारच्या जनजागृती व तपासणी शिबिरांमुळे नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मदत होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# सायं.दैनिक बीड किसान चे कार्यकारी संपादक अदनान खान यांना पितृशोक

बीड (प्रतिनिधी) - सायं. दैनिक बीड किसान चे कार्यकारी संपादक अदनान खान पठाण यांचे वडील सेवानिवृत्त मुख्याध्यापक उस्मान खान पठाण यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. त्यांची नमाज़ ए जनाज़ा दिनांक १४ मे २०२६ गुरुवार रोजी दुपारी ०३:०० वाजता बालेपीर दरगाह मस्जिद येथे पठण करण्यात आली तर दरगाह कब्रस्तान येथेच दफनविधी करण्यात आला. मृत्यू समयी त्यांचे वय ७६ वर्ष होते.

उस्मान खान सर हे प्रथम सहशिक्षक म्हणून शिक्षण विभागात रुजू झाले होते. शैक्षणिक गुणवत्तापूर्ण शिक्षण व मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देऊन चांगले विद्यार्थी घडवीत असल्याने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना काही वर्षातच मुख्याध्यापक पदी पदोन्नती मिळाली होती. विद्यार्थ्यांना नेहमी चांगले दर्जेदार शिक्षण मिळावे हाच ध्यास त्यांना नेहमी असायचा. विद्यार्थ्यांना ते आपल्या मुलांप्रमाणे जीव लावायचे. शिक्षक म्हणून ते जेवढे कर्तव्यदक्ष होते तेवढेच कठोर निर्णय घेणारे म्हणूनही प्रसिद्ध होते. शाळा, शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक कठोर निर्णय सुद्धा घेतले होते म्हणून ते सेवेत असताना आणि सेवानिवृत्त झाल्यावरही समाजात तेवढेच लोकप्रिय होते.

गेल्या काही काळापासून वृद्धापकाळाने आजारी असल्याने त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू होते परंतु त्यांच्या शरीराने उपचारांना साथ न दिल्याने त्यांची प्राणज्योत अखेर मालवली. त्यांच्या निधनाने खान कुटुंबीयांनी घरातला कर्ता पुरुष आणि समाजाने एक चांगला सुहृदयी हाडाचा शिक्षक गमावला. त्यांच्या पश्चात तीन मुली-जावई, एक मुलगा-सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# अंबानगरीत श्री गजानन विजय ग्रंथाच्या सामुदायिक पारायण सोहळ्याचे आयोजन

### काल्याचे कीर्तन, दीपोत्सव व महाप्रसादाने होणार सांगता

अंबाजोगाई : येथील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने श्री गजानन विजय ग्रंथाच्या चार दिवसीय सामुदायिक पारायण सोहळ्याचे आयोजन २६ मे ते २९ मे दरम्यान सकाळी ७ ते १० या वेळेत शहरातील देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले आहे. सोहळ्याची सांगता शुक्रवार, २९ मे रोजी सकाळी १० वाजता हभप शिवाजी महाराज मुळे (आडस) यांच्या काल्याच्या कीर्तनाने होणार असून, त्यानंतर पालखी उत्सव, महाआरती, महाप्रसाद, ‘सत्संग श्री गजाननाचा’ तसेच ‘श्रीं’ची दीपोत्सवात शेजारती होऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात येणार आहे. या पारायण सोहळ्यासह विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

शहरातील श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने हभप वै. दत्तात्रय जोशी महाराज नळेगावकर यांच्या कृपाआशीर्वादाने गेली १३ वर्षे श्री गजानन विजय ग्रंथाचे सामुदायिक पारायण सोहळे तसेच भक्ती संगीत, कीर्तन व पालखी उत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी २६ मे ते २९ मे २०२६ दरम्यान पारायण सोहळ्याचे आयोजन देशपांडे गल्लीतील धाकटे देवघर येथे करण्यात आले असून, यंदाचे हे १४ वे वर्ष आहे.चार दिवसीय पारायण सोहळा प्रमुख हभप आनंद महाराज जोशी नळेगाव यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी ७ ते १० या वेळेत पार पडणार आहे. अधिक ज्येष्ठ शुद्ध ११, मंगळवार, २६ मे रोजी पहाटे ४ वाजता मंगलध्वनीने सोहळ्याची सुरुवात होणार आहे. पहाटे ५ वाजता



‘श्रीं’ना रुद्राभिषेक व आरती होईल. त्यानंतर सकाळी ७ ते १० या वेळेत श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण, महाप्रसाद तसेच सायंकाळी ५ वाजता श्री विठ्ठल-रुक्मिणी महिला भजनी मंडळाचे सांप्रदायिक भजन होणार आहे. सायंकाळी ६.३० वाजता हभप श्रीपाद बुवा अभ्यंकर, पिंपरी-चिंचवड (पुणे) यांचे कीर्तन होईल.२७ मे रोजी पारायण, आरती तसेच सायंकाळी ५ वाजता सरोजनी देशपांडे, वैशाली विडेकर व मधुरा बाभुळगावकर यांचे भक्ती संगीत होणार असून, सायंकाळी ६.३० वाजता हभप प्रभंजन महाराज भगत (लोणी) यांचे कीर्तन होईल.

गुरुवार, २८ मे रोजी अध्याय १५ ते २१ चे पारायण, त्यानंतर ग्रंथपूजन, ग्रंथदिंडी, पारायण आरती तसेच श्री गजानन महाराजांचा पालखी उत्सव होणार आहे. सायंकाळी ५ वाजता अंबानगरीतून ‘श्रीं’चा पालखी सोहळा धाकटे देवघर, देशपांडे गल्ली – बाजीप्रभू चौक – केशवनगर रोड – दीनदयाळ कॉलनी – श्री गजानन महाराज मंदिर, चौसाळकर कॉलनी – डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक – कुत्तर विहीर – देशपांडे गल्ली – धाकटे देवघर या मार्गाने निघणार आहे.दि. २९ मे रोजी पहाटे ५ वाजता ‘श्रीं’ना रुद्राभिषेक व आरती होईल. सकाळी १० वाजता हभप शिवाजी महाराज मुळे (आडस) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर मंडळाच्या वतीने ‘कै. दत्तात्रय महाराज जोशी स्मृती आध्यात्मिक सेवा पुरस्कार’ हभप रामचंद्र महाराज चिंचोलकर, संभाजीनगर (मुख्य प्रवर्तक, श्रीक्षेत्र पैठण ते श्रीक्षेत्र शेगाव पायी दिंडी सोहळा) यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यानंतर महाआरती व महाप्रसाद होणार आहे.रात्री ८ वाजता श्री संत गजानन महाराज भक्त मंडळ, अंबाजोगाई संचलित ‘सत्संग श्री गजाननाचा’ तसेच ‘श्रीं’ची दीपोत्सवात शेजारती होऊन कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

पारायण सोहळा, श्रीची मिरवणूक व विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ अंबाजोगाई शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्री संत गजानन महाराज भक्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

CMYK

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## धाराशिवमध्ये कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे वाहतूक

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**



शहरातील खिरणी मळा परिसरात गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक करत असल्याप्रकरणी धाराशिव शहर पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी राजेंद्र मच्छिंद्र मगर (वय ३६, रा. पापनास नगर, तुळजापूर नाका, धाराशिव) हा दि. १७ मे २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास खिरणी मळा येथील गुलशन अलफाज शाळेजवळील रस्त्यावरून दोन जर्सी व गावराण गायी तसेच एक खोंड अशी एकूण ७० हजार रुपये किंमतीची गोवंशीय जनावरे कत्तलीच्या उद्देशाने बेकायदेशीररीत्या घेऊन जात असल्याचे पोलिसांना आढळून आले.

या प्रकरणी धाराशिव शहर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम कलम ५(अ)(१), ९ अ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### जय श्रीराम घोषणांनी डोकेवाडी नगरी दुमदुमली

**भूम, दि.१८ मे -**

भूम तालुक्यातील डोकेवाडी येथे मागील सहा महिन्यांपासून विठ्ठल मंदिरात दररोज दोन तास भावार्थ रामायण सोहळा सुरू होता. या सोहळ्यातील लक्ष्मण शक्ती कार्यक्रम रविवारी दि.१७ रोजी रात्री भक्तीमय वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रम हभप. विकास महाराज जालन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. जय श्रीरामच्या घोषणांनी संपूर्ण नगरी दुमदुमून गेली होती. गावातील रामभक्त अयोध्येहून १४ दिवसांचा वनवास पूर्ण करून गावी परतल्यानंतर त्यांची भजन मंडळाच्या वतीने गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमात रामाभाऊ डोके, सुरेश खैरे, विशाल डोके, प्रवीण डोके, हनुमंत जालन, काशिनाथ डोके, बाबू तेलप, सुरेश पवार, रघुनाथ आहेर, ऋषिकेश चव्हाण आदींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विकास जालन, हनुमंत आहेर, लक्ष्मण आहेर, हरिदास आहेर, अजय साळुंके, बाजीराव जालन, श्रीमंत जालन, प्रभाकर आहेर आदींनी परिश्रम घेतले.

### धानुरीच्या शेतकरी पुत्राची दिल्लीत कराटेत चमक

**लोहारा, दि.१८ मे -**

लोहारा तालुक्यातील धानुरी येथील शेतकरी पुत्र आरोह अमर साळुंके याने कोणत्याही विशेष सोयी-



सुविधांशिवाय आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. दिल्ली येथे दि.१७ व १८ मे रोजी झालेल्या इंडिया पेन आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेत आरोहने पहिल्याच प्रयत्नात एक रौप्य (सिल्वर) व एक कांस्य (ब्राँझ) पदक पटकावून गावासह परिसराची मान उंचावली आहे. आरोहने प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, धानुरी येथे पूर्ण केले असून पुढील शिक्षणासाठी तो पुणे येथे शिक्षण घेत आहे. शालेय अभ्यास सांभाळत त्याने कराटेचा सराव सुरू ठेवला. शाळेतील कराटे स्पर्धा पाहिल्यानंतर त्याला या खेळाची आवड निर्माण झाली आणि गेल्या वर्षापासून त्याने नियमित सरावाला सुरुवात केली. आरोहच्या या यशाबद्दल गावकरी, मित्रमंडळ व विविध स्तरातून त्याचे अभिनंदन करण्यात आहे.

### अनुष्काचे प्रज्ञाशोध परीक्षेत यश

**कळंब, दि.१८ मे -**

महर्षी वाल्मिकी शिक्षण प्रसारक मंडळ, वैराग यांच्या वतीने घेण्यात आलेल्या ए.टी.एस. प्रज्ञाशोध



परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, कळंब तालुक्यातील खामसवाडी (शिवपुर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या इयत्ता पहिलीत शिकणाऱ्या अनुष्का अमोल सोनटक्के हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अनुष्काने १०० पैकी ७४ गुण मिळवत आपल्या गुणवत्तेची छाप पाडली. भाषा व गणित विषयात तिने ५० पैकी ४२ गुण, तर इंग्रजी व बुद्धिमत्ता विषयात ५० पैकी ३२ गुण मिळवले. या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश नरसिंगे यांनी अनुष्काचे अभिनंदन केले.

### कारच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**उमरगा, दि.१८ मे -**

तालुक्यातील कवठा पाटी येथे भरधाव कारच्या धडकेत एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी कार चालकाविरुद्ध उमरगा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राधिका बिभीषण भोगीले (वय ३५, रा. कवठा, ता. उमरगा) या दि.१२ मे रोजी कवठा पाटी येथील बसथांब्यावर एकुरगा येथे जाण्यासाठी उभ्या होत्या. त्यावेळी एमएच २५ एजे १७८५ क्रमांकाच्या कार चालकाने वाहन भरधाव व निष्काळजीपणे चालवून त्यांना धडक दिली. या अपघातात त्या गंभीर जखमी झाल्या व त्यांचा मृत्यू झाला.

## अणदूरमध्ये शिवभक्तांचा महाकुंभ; जगद्गुरु आगमनाने उत्साह

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१८ मे -**

तुळजापूर तालुक्यातील अणदूर येथील नीलकंठेश्वर मठात सुरू असलेल्या त्रिवेणी धार्मिक महोत्सवाने संपूर्ण पंचक्रोशी भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाली आहे. मठाधीपती श्री प्रभू लिंगेश्वर महास्वामीजी यांचा जन्मशतक महोत्सव, वैराग्यमूर्ती शिवयोगी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पट्टाभिषेक रौप्य महोत्सव व जन्मदिन सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांना भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

दि.१३ मेपासून सुरू झालेली पंडित श्री हरिहरानंद भारती स्वामीजी यांची रसाळ शिवकथा या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरत आहे. आपल्या सुमधुर वाणीतून पुराणातील दाखले देत स्वामीजी शिवमहिमेचे वर्णन करीत असून, ही कथा ऐकण्यासाठी अणदूरसह पंचक्रोशीतील हजारो शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत. विशेष म्हणजे महिलांची उपस्थिती लक्षणीय असून, दररोज सायंकाळी ५ ते ७ या वेळेत कथा स्थळी अभूतपूर्व गर्दी पाहायला मिळत आहे.

वाद्यांचा गजर, हर हर महादेवच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला असून, भक्तगण मंत्रमुग्ध होत असल्याचे चित्र दिसत आहे. शिवकथेनंतर दररोज महाप्रसादाचेही मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्यात येत आहे.



दरम्यान, मंगळवार दि.१९ मे रोजी चार पीठांचे श्रीमद् जगद्गुरूंचे आगमन होणार असून, पंचपीठाधीश्वरांचा अड्डपालखी महोत्सव आणि सुवासिनींची भव्य कुंभ मिरवणूक यासाठी संपूर्ण अणदूर नगरी सज्ज झाली आहे. जगद्गुरूंच्या आगमनाने अणदूर नगरी पावन होणार असल्याची भावना भाविकांत व्यक्त होत असून, त्यांच्या स्वागतासाठी ग्रामस्थ आतुरतेने प्रतीक्षा करत आहेत.

हा अभूतपूर्व धार्मिक महोत्सव यशस्वी करण्यासाठी महोत्सव समिती अध्यक्ष तथा माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, मार्गदर्शक गंगाधर महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली सरपंच रामचंद्र आलुरे, कल्याणी मुळे, संतोष मुळे, बाबुराव मुळे, राजेंद्र स्वामी, श्रीशैल लंगडे, अप्पासाहेब आलुरे, सोमनाथ डांगे, बसवराज नरे, माणिक मुळे, रामलिंग नरे, खंडू मुळे आदींसह ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत.

## कडदोरा-बलसुर पाणीपुरवठ्यासाठी नवीन २५ केव्ही डीपीचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ मे -**

तालुक्यातील कडदोरा व बलसुर येथील पाणीपुरवठा विहिरीस २४ तास अखंडित विद्युत पुरवठा मिळावा यासाठी उभारण्यात आलेल्या नवीन २५ केव्ही डीपीचे उद्घाटन दि. १८ रोजी भाऊसाहेब बिराजदार सहकार कारखान्याचे चेअरमन प्रा. सुरेश दाजी बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले.

गावातील पाणीपुरवठा विहिरीमध्ये मुबलक पाणी उपलब्ध असूनही वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थांना नियमित पाणीपुरवठा करण्यात अडचणी येत होत्या. या समस्येची दखल घेत प्रा. सुरेशदाजी बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित अधिकारी व ग्रामस्थांची बैठक घेण्यात आली होती. त्यानुसार बलसुर तांडा येथून पाणीपुरवठा विहिरीपर्यंत नवीन १८ पोलसह विद्युत लाईन टाकून २५ केव्ही डीपी बसविण्यात आली.

या कामामुळे आता कडदोरा व बलसुर गावांचा पाणीपुरवठा अधिक सुरळीत व नियमित होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे. उद्घाटन प्रसंगी ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामस्थ व विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ मे -**

तालुक्यातील कुन्हाळी येथील सोनी रणजित गोजले (वय २७) यांनी दि. १७ मे रोजी सकाळी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.

या प्रकरणी माहेरहून पैसे आणण्याच्या कारणावरून शारीरिक व मानसिक छळ केल्याचा आरोप करत उमरगा पोलिस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी मारुती नागाप्पा इश्वरे (रा. वाडी कासार शिरसी, ता. निलंगा, जि. लातूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार फुलाबाई राजाराम गोजले, रणजित राजाराम गोजले, बालाजी राजाराम गोजले, संजय राजाराम गोजले व शुभद्रा संजय भेगिले (सर्व रा. कुन्हाळी, ता. उमरगा) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ८५, १०८, ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## राघुचीवाडीत घरफोडी; सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

शहरातील राघुचीवाडी परिसरात अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ६३ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी गौतम भगवान गेजगे (वय ३५, रा. राघुचीवाडी, धाराशिव) यांच्या राहत्या घराचे मुख्य गेटचे कुलूप दि. १६ मे रोजी रात्री ७.३० ते दि. १७ मे रोजी सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व ५० हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ६३ हजार रुपयांचा माल चोरून नेला. या प्रकरणी गौतम गेजगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

## डोनेट ए बुक उपक्रमातून गावागावांत उभरणार ग्रंथालये

### वाचन संस्कृती जपण्यासाठी विद्यापीठाची अभिनव मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

मोबाईल आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावामुळे वाचन संस्कृती कमी होत चालल्याची चिंता व्यक्त होत असताना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने डोनेट ए बुक अर्थात ग्रंथदानातून ग्रंथालय उभारणीची अभिनव चळवळ सुरू केली आहे. या उपक्रमातून विद्यापीठाने दत्तक घेतलेल्या गावांमध्ये लहान ग्रंथालये उभारण्यात येणार आहेत.

समाजातील पुस्तकप्रेमींना आपल्या घरी असलेली उपयुक्त पुस्तके दान करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अनेक जण विविध प्रकारची पुस्तके खरेदी करून वाचन करतात; मात्र वाचन पूर्ण झाल्यानंतर



ती पुस्तके कपाटात पडून राहतात किंवा रद्दीत दिली जातात. अशा पुस्तकांचा समाजोपयोग व्हावा आणि ती नव्या वाचकांपर्यंत पोहोचावीत, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या मोहिमेंतर्गत शैक्षणिक पुस्तकांबरोबरच कथा, कादंबऱ्या, चरित्रे, प्रेरणादायी, सामाजिक, ऐतिहासिक, धार्मिक आणि साहित्यिक पुस्तकेही दान स्वरूपात स्वीकारली जाणार आहेत. जमा होणारी पुस्तके ग्रामीण भागातील नव्याने उभारण्यात येणाऱ्या ग्रंथालयांमध्ये उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

या मोहिमेमागील प्रमुख उद्देश आहे. पर्याय चांगला असेल तर समाज तो नक्की स्वीकारतो या भावनेतून ही चळवळ राबविण्यात येत असून, अधिकाधिक नागरिकांनी या ज्ञानयज्ञात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

ग्रंथदान करू इच्छिणाऱ्या नागरिकांनी संबंधित जिल्हा समन्वयक अथवा राष्ट्रीय सेवा योजना विभागाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

> डिजिटल युगात तरुण पिढी वाचन संस्कृतीपासून दूर जात असली तरी ई-बुकसारखी आधुनिक माध्यमे विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरत आहेत. तरुणांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक भेट, पुस्तकांचे आदान-प्रदान आणि सार्वजनिक ग्रंथालयांना पुस्तक दान करण्यासारख्या उपक्रमांची गरज असल्याचे मत डॉ. राजेश बोपलकर यांनी व्यक्त केले. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना सकारात्मक विचारातून वाचन संस्कृती जपणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. गावागावांत लहान ग्रंथालयांची उभारणी झाली तर तो समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम ठरेल, असेही ते म्हणाले.
>
> **- डॉ. राजेश बोपलकर,** राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी

## संतांच्या सहवासाने जीवन समृद्ध होते : हभप. जगताप महाराज

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१८ मे -**

इटकळ येथे पंधरवडा सत्संगाच्या पहिल्या वर्धापन दिन सोहळ्याचे आयोजन मोठ्या उत्साहात करण्यात आले. प्रभू रामचंद्र यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप. विष्णुपंत मुंढे होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून हभप. नितीन महाराज जगताप यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. संतांच्या सहवासामुळे माणूस आत्मिकदृष्ट्या समृद्ध होतो आणि त्याच्या जीवनाचे सोनं होते, असे प्रतिपादन त्यांनी केले. आजच्या काळात परमार्थाचाही बाजार झाला असून केवळ दिखाऊपणाने अध्यात्म साध्य होत नाही. विचारांची शुद्धता, सकारात्मक बदल आणि सुसंस्कृत जीवन हीच खरी परमार्थाची वाट असल्याचे त्यांनी सांगितले.

संतांचा सहवास माणसाला संयम, संस्कार आणि सद्विचार देतो. सूर्य-चंद्र जोपर्यंत अस्तित्वात आहेत तोपर्यंत संतांचे विचार अमर राहतील, असेही हभप. नितीन महाराज जगताप यांनी नमूद केले. यावेळी हभप. शिवाजी चव्हाण, हभप. अशोकराव जाधव, हभप. दगडू जोडभावे व हभप. दीपक महाराज निकम यांनी सत्संगाचे आध्यात्मिक व सामाजिक महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामभक्त हभप. दिनेश सलगरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मल्लीनाथ बिराजदार यांनी तर आभार प्रदर्शन हभप. विष्णुपंत मुंढे यांनी केले.

कार्यक्रमासाठी उमरगा, तुळजापूर, औसा, लोहारा, अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेकडो संत व रामभक्त उपस्थित होते.

## तुळजाभवानी मंदिरातील बंदी आदेशाचे उल्लंघन; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ मे -**

श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात प्रवेशबंदी असतानाही मंदिरात प्रवेश करून गेटचे लॉक तोडून नुकसान केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध तुळजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभिषेक आशोकराव साळुंके व हर्ष सोंजी (दोघे रा. तुळजापूर) यांनी दि.१० मे रोजी श्री तुळजाभवानी मंदिरातील दर्शन मंडपाच्या चौथ्या मजल्यावरील देरेस गेट येथे प्रवेशबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याचा आरोप आहे. तसेच मंदिराच्या गेटचे लॉक तोडून नुकसान केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी ऋषीकेश बाबासाहेब पराडे (रा. विवेकानंदनगर, तुळजापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम २२३, ३२४ (४), ३ (५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत आहेत.

## बोलक्या भिंतींमुळे डोकेवाडी शाळेचा बदलला चेहरामोहरा; विद्यार्थ्यांसाठी आनंददायी शिक्षणाचा नवा उपक्रम







**महावीर जालन**
**भूम, दि.१८ मे -**

तालुक्यातील डोकेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बोलक्या भिंती या अभिनव उपक्रमातून विद्यार्थ्यांना आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याचा स्तुत्य प्रयत्न सुरू आहे. आकर्षक रंगरंगोटी, शैक्षणिक चित्रे आणि माहितीपूर्ण भिंतींमुळे शाळेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला असून, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

येथील मुख्याध्यापक संजय क्षीरसागर, सहशिक्षक सोमनाथ तौर, संघ लोखंडे, रुपाली गवळी, सविता गिरी व रजनी आहेर हे शिक्षक-शिक्षिका अहोरात्र मेहनत घेऊन विद्यार्थ्यांना नवनवीन माध्यमातून शिक्षण देत आहेत. त्यांच्या प्रयत्नातून शाळेतील भिंती आता अक्षरशः बोलक्या झाल्या आहेत.

शाळेतील भिंतींवर सप्तरंगी इंद्रधनुष्य, तारांगण, सूर्य, चंद्र, प्राणी-पक्षी यांची चित्रे रेखाटण्यात आली आहेत. त्याचबरोबर मराठी बाराखडी, इंग्रजी व मराठी महिने, दिशाज्ञान, व्याकरण, गणितीय सूत्रे, बेरीज-वजाबाकी, गुणाकार-भागाकार, पर्यावरण, भूगोल, विज्ञान माहिती तसेच नकाशे आदी शैक्षणिक माहिती चित्ररूपाने साकारण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना खेळता-खेळता शिक्षण घेणे अधिक सोपे झाले आहे.

डोकेवाडी येथील ही शाळा तालुक्यातील पहिली ते सातवीपर्यंतची सेमी इंग्रजी माध्यमातील शाळा असून, एकेकाळी ग्रामीण भागातील सामान्य शाळा म्हणून ओळखली जाणारी ही शाळा आता आधुनिक व आनंददायी शिक्षण देणारी शाळा म्हणून पुढे येत आहे. शिक्षकांनी नाविन्यपूर्ण कल्पना राबवत शाळेचे रूप पालटले. आकर्षक प्रवेशद्वार उभारण्यात आले असून, संपूर्ण शाळा रंगीबेरंगी शैक्षणिक चित्रांनी सजली आहे. या उपक्रमासाठी गावातील नागरिक, नोकरदार, परगावी वास्तव्यास असलेले ग्रामस्थ यांचेही मोठे सहकार्य लाभले आहे.

विशेष म्हणजे शाळेचे माजी विद्यार्थी व विद्यमान पंचायत समिती सदस्य बाळासाहेब खरवडे यांनी स्वखर्चातून शाळेची रंगरंगोटी करून या उपक्रमाला आर्थिक हातभार लावला आहे.

> शाळा डिजिटल माध्यमाकडे वाटचाल करत आहे. येथे अद्ययावत ई-लर्निंग कक्ष व संगणक विभाग आहे. आता डिजिटल रंगरंगोटीमुळे शाळेचे रूप पूर्णपणे बदलले आहे. गावातील युवकांच्या सहकार्यामुळे हे काम शक्य झाले.
>
> **- सोमनाथ तौर,** सहशिक्षक

> ज्या शाळेत आयुष्याची बाराखडी शिकलो, त्या शाळेचे आपण काहीतरी देणे लागतो. त्यामुळे समविचारी तरुणांना सोबत घेऊन मी स्वखर्चातून शाळेची रंगरंगोटी केली. भिंती बोलक्या झाल्याने विद्यार्थ्यांना शिकण्याची प्रेरणा मिळत आहे. गावाची उद्याची पिढी घडवणाऱ्या शाळेची गुणवत्ता जपणे हे आपले कर्तव्य आहे.
>
> **- बाळासाहेब खरवडे,** पंचायत समिती सदस्य

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक जाहीर

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ मे : भारत निवडणूक आयोगाने विधानपरिषदेच्या उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला आहे. त्यानुसार २५ मे २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ पर्यंत असून उमेदवारी अर्जांची छाननी २ जून २०२६ रोजी केली जाईल, तसेच उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ अशी निश्रि्चत करण्यात आली आहे.

यानंतर गुरुवार, १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडणार असून सोमवार, २२ जून २०२६ रोजी मतमोजणी केली जाईल आणि संपूर्ण निवडणूक प्रक्रिया २५ जून २०२६ पर्यंत पूर्ण केली जाईल. निवडणूक निर्णय अधिकारी तथा धाराशिवचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी या निवडणूक कार्यक्रमाची माहिती दिली असून केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार संपूर्ण मतदारसंघात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असल्याचे त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.



# विविध वृत्त...

## पंतप्रधानांच्या आवाहनाचे शिक्षक पुरस्कार वितरणावर सावट

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ : शासकीय कार्यक्रम भव्य स्वरूपात आयोजित करू नयेत, असे आवाहन पंतप्रधानांनी केल्याने येत्या २१ मे २०२६ रोजीचा प्रस्तावित आदर्श शिक्षक व आदर्श ग्रामसेवक पुरस्कार वितरण कार्यक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. २२ मे २०२६ रोजीची जिल्हा नियोजन समिती बैठक देखील ऑनलाईन होईल, अशी चर्चा आहे.

लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी २१ मे २०२६ रोजी आदर्श शिक्षक व आदर्श ग्रामसेवक पुरस्कारासाठी वेळ देण्याचे मान्य केल्याने शिक्षकांत उत्साह पसरला होता. इराण-अमेरिक-इस्त्राईल युद्धाच्या पार्श्र्वभूमीवर, देशाच्या पंतप्रधानांनी इंधन वापर कमी करा, असे आवाहन गेल्या आठवड्यात केल्याने शासकीय कार्यक्रम भव्य स्वरूपात आयोजित करणे योग्य नाही, अशी एक भूमिका मांडली जात आहे. त्यामुळे शिक्षक, ग्रामसेवक पुरस्कार वितरणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. बहुतेक पुरस्कार कार्यक्रम पुढे ढकलला जाण्याची दाट शक्यता आहे. जिल्हा परिषद अध्यक्षा उषा पाटील यांनी शिक्षक-ग्रामसेवक पुरस्कार वितरणासाठी पालकमंत्र्यांची तारीख घेतली. २२ मे

२०२६ रोजी जिल्हा नियोजन समितीची बैठक आहे. त्या अगोदर एक दिवस म्हणजे २१ मे २०२६ रोजी पुरस्कार वितरण कार्यक्रमास हजेरी लावण्याचे पालकमंत्र्यांनी मान्य केले. ही बाब जिल्हा परिषद वर्तुळात पसरली आणि शिक्षकांत उत्साह पसरला. परंतु, त्यानंतर पुढे एकच दिवसाने पंतप्रधानांनी इंधन बचतीच्या आवाहन करून भव्य कार्यक्रम म्हटले की वाहनांचा आलाच. ही बाब ओळखून पुरस्कार कार्यक्रम तात्पुरता स्थगित करण्याच्या हालचाली जिल्हा परिषद पातळीवर सुरू आहे. बहुतेक नियोजित पुरस्कार वितरण कार्यक्रम रद्द होण्याची शक्यता आहे.

## कचरा जाळून क्रीडा संकुलात प्रदूषण

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ : येथील जिल्हा क्रीडा संकुलात दररोज हजारो आरोग्यप्रेमी व्यायामासाठी येतात. या परिसरातील कचरा उचलून नेण्याऐवजी तो जाळला जातो. यामुळे परिसरातील हवा दूषित होऊन नागरिकांचेच आरोग्य धोक्यात येत आहे. शनिवारी (दि.१६) पेटविलेल्या कचऱ्यातून रविवारीही धूर निघत असल्याने त्याचा त्रास सामान्यांना होत होता.

बहुउद्देशीय इमारतीच्या मागील बाजूस नियमितपणे झाडांचा पालापाचोळा व इतर कचरा जाळण्यात येतो. काल पहाटेपासून पेटविण्यात आलेला कचरा आजही धुमसत असल्याचे दिसून आले. या धुराचे मोठ्या प्रमाणात ट्रॅकवर प्रसारण होत असून चालताना व धावताना नागरिकांच्या श्र्वासावाटे हा धूर शरीरात जात आहे. विशेषतः व्यायाम करताना वेगाने होणाऱ्या श्र्वासोच्छ्वासामुळे हा परिणाम अधिक घातक ठरू शकतो.

याशिवाय, ओपन जीमच्या मागील बाजूस असलेल्या भागातूनही निघणारा धूर वॉकिंग ट्रॅकवर येतो. यामुळे संपूर्ण ट्रॅक प्रदूषणाच्या विळख्यात सापडला आहे. यातून नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. येथील पालापाचोळा नियमितपणे घंटागाडीत टाकण्यास महापालिकेचे दुर्लक्ष होत आहे.

त्याचप्रमाणे या संकुलात प्रदूषण होऊ नये, यासाठी व्यापाऱ्यांनीही काळजी घेण्याची गरज आहे. शहरात नागरिकांसाठी चालणे, धावणे व व्यायाम करण्यासाठी मोजकीच सार्वजनिक ठिकाणे उपलब्ध आहेत. नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी क्रीडा संकुलांवरील प्रदूषण नियंत्रण व स्वच्छतेकडे लक्ष देण्याची मागणी व्यायाम करणाऱ्या नागरिकांतून होत आहे.

# अखेर प्रा. शिवराज मोटेगावकर सीबीआयच्या जाळ्यात

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ मे : नीट पेपर फुटी प्रकरणी अखेर सीबीआयने लातूरच्या बहुचर्चित रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस अर्थात आरसीसी चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांना ताब्यात घेतले आहे. नीट पेपर फुटी प्रकरणी सुरुवातीपासूनच संशयाची सुई प्रा. मोटेगावकर यांच्याकडे वळत असल्याचे निदर्शनास आले होते.

मोटेगावकर यांच्यावरील सीबीआयच्या या कारवाईने लातूरच्या खाजगी शिकवणी वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी होत असलेल्या आरोपांपासून स्वतःची सुटका करून घेण्याचे मोटेगावकर यांचे सर्व प्रयत्न अखेर अपयशी ठरले. ' काहीही ' करून आपण या प्रकरणातून सहीसलामत सुटू असा त्यांचा अति आत्मविश्र्वास सीबीआयच्या कारवाईसमोर फोल ठरल्याचे एकंदर परिस्थितीवरून पाहायला मिळत आहे.

नीट पेपर फुटी प्रकरण प्रकाशात आल्यापासून याप्रकरणी देशभर सीबीआयकडून केल्या जाणाऱ्या कारवाईकडे लातूरकर कुतूहलाने पाहत होते. या प्रकरणी लातुरातून सर्वप्रथम



जेव्हा सेवानिवृत्त प्रा. पी.व्ही. कुलकर्णी यांना सीबीआयने ताब्यात घेतले तेव्हा हे प्रकरण आपल्याजवळच शिजतेय, याचा सर्वांना अंदाज आला. प्रा. कुलकर्णी यांची चौकशी केल्यानंतर त्यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर सीबीआयचे २८ सदस्यीय पथक शुक्रवारी आरसीसी चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्याकडे पोहोचले होते. तेव्हा या पथकाने मोटेगावकर यांची तब्बल आठ ते नऊ टास्कसून चौकशी केली होती. या चौकशीदरम्यान पथकाला काही महत्वपूर्ण दस्तावेज, कागदपत्रे मिळाल्याचेही सांगितले गेले. पण, सलग आठ तासांहून अधिक चौकशी करून पथकाने मोटेगावकरांना पुण्याच्या सीबीआय कार्यालयात हजर राहण्याची नोटीस बजावली होती.

प्रा. मोटेगावकर यांची रविवारी पुण्यात सीबीआय कार्यालयात पुन्हा अकरा तास कसून चौकशी करण्यात आली. या चौकशीनंतर सोमवारी सकाळी सीबीआयने त्यांना पुढील कारवाईसाठी त्यांना आपल्या ताब्यात घेतले. मोटेगावकर यांना सोमवारी रात्रीपर्यंत दिल्लीला सीबीआयच्या न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. तत्पूर्वी सीबीआयने मोटेगावकर यांच्या आरसीसी क्लासेसवर छापे टाकून कार्यालयातील संगणक, लॅपटॉप व अन्य इलेक्ट्रॉनिक्स उपकरणांची सखोल तपासणी केली. दि. ३ मे रोजी झालेल्या नीट परीक्षेचा पेपर परीक्षेच्या तब्बल दहा दिवस आधीच प्रा. मोटेगावकर यांच्या मोबाईलमध्ये सापडला असल्याची महत्वपूर्ण माहितीही सीबीआयच्या हाती लागली आहे. प्रा. मोटेगावकर हे नीट पेपर फोडणाऱ्या टोळीचे एक सक्रिय सदस्य असल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याचेही सांगितले जात आहे. फोडण्यात आलेला नीटचा पेपर कोणाकोणाला पोहोचवला ? याची विचारणा मोटेगावकर यांना केली असता त्यांनी याबाबत अद्याप कोणाचेही नाव सांगितले नसल्याचे समजते. त्यामुळे सीबीआयकडून आता मोटेगावकर यांच्या बँक डिटेल्सचीही चौकशी केली जात आहे. त्यांच्या बँक खात्यात जमा झालेले पैसे कोणाच्या खात्यावरून आले याचा तपशील उजेडात आल्यास अनेक नावे पुढे येतील,असे सांगितले जात आहे.

प्रा. मोटेगावकर यांच्यावर सीबीआयकडून सोमवारी झालेल्या या कारवाईने लातूरच्या खाजगी शिकवणी वर्तुळात खळबळ उडाली आहे. नीटचा पेपर हा काही यावेळीच फुटला नाही. वर्ष २०२४ मध्येही नीटचा पेपर फुटला होता, त्या प्रकरणाशीही मोटेगावकर तसेच आतापर्यंत या प्रकरणात अडकलेल्या व्यक्तींचा सहभाग होता का ? या दृष्टीनेही आता सीबीआय या प्रकरणाचा छडा लावणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

## बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीच्या विरोधात औषधी विक्रेत्यांचा देशव्यापी बंद : भोसले

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ : ऑल इंडिया केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्रीच्या विरोधात बुधवार, दि. २० मे २०२६ रोजी देशव्यापी बंदचे आवाहन केले आहे. लातूर जिल्ह्यातील औषधी विक्रेते या बंदमध्ये पूर्णपणे सहभागी होणार असल्याची माहिती लातूर जिल्हा केमिस्ट अँड ड्रगिस्ट असो. चे अध्यक्ष रामदास भोसले यांनी दिली.

औषध विक्री व्यवसाय हा औषधे आणि सौंदर्य प्रसाधने अधिनियमांतर्गत चालवला जातो. औषधांची ऑनलाईन विक्री करण्यासंदर्भांत अधिनियमात कोणतीही तरतूद नाही. तरीही केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषध विक्रीबाबतची सूचना जरी केली होती. मात्र, त्या सूचनेचे अद्याप कायद्यात रूपांतर झालेले नसतानाही देशात बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री सुरु आहे.यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून दिल्ली उच्च न्यायालयानेही ऑनलाईन औषध विक्रीस स्थगितीही दिली आहे. असे असतानाही सरकार औषधी विक्रेत्यांच्या मागणीकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे. सरकारने कोरोनाच्या काळात औषधांच्या होम डिलिव्हरी देण्याबाबत विशेष सूट दिली होती. कोरोना संपूनही बराच काळ उलटला तरी याबाबतची अधिसूचना रद्द करण्यात आलेली नाही. याचा गैरफायदा घेऊन ऑनलाईन औषध विक्री केली जात आहे. यामुळे अनेक छोटे व्यावसायिक - औषध विक्रेते अडचणीत येत आहेत. ग्रामीण भागातील औषधी वितरण व्यवस्था धोक्यात येत आहे. यासंदर्भात शासन - प्रशासनाकडेही वारंवार निवेदने देण्यात आली आहेत. तरीही यावर अद्याप कोणतीही करावबाई न करण्यात आल्याच्या निषेधार्थ दि. २० मे रोजी देशभर औषधी विक्रेते एक दिवसाचा बंद पाळणार आहेत. याची ग्राहकांनी नोंद घ्यावी व आपली अत्यावश्यक नियमित औषधी आल्याकडे आहेत, याची खात्री करून घ्यावी. दि. १९ मे च्या रात्रीपासून दि. २० मे च्या रात्री पर्यंत २४ तास औषधी दुकाने बंद ठेवण्यात येणार आहेत.

लातूर जिल्ह्यातील सर्व औषधी विक्रेत्यांनी या बंदमध्ये सहभागी व्हावे,असे आवाहन अध्यक्ष रामदास भोसले, सचिव अरुण सोमाणी, उपाध्यक्ष ओमप्रकाश बाहेती, अनिल स्वामी, धनंजय जोशी, सत्यवान सूर्यवंशी, रामकुमार सोनटक्के, सहसचिव प्रकाश साखरे, ईश्र्वरचंद्र बाहेती, अंकुश भोसले, संगमेश्र्वर नीला ,कोषाध्यक्ष अतुल कोटलवार , रमेश भांगडिया, नाथराव मुंडे, नागेश स्वामी, सौ. दीपाली निनगुरकर, जयप्रकाश रेड्डी, बालाजी थेटे , रमाकांत भुरकापल्ले आदींनी केले आहे.

## 'पॉलिटेक्निक 'च्या प्रवेशासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया लवकरच

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ : पॉलिटेक्नीक अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरण्याच्या प्रक्रियेस लवकरच सुरूवात होणार आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने पॉलिटेक्नीक प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी जाहीर करण्यात आली आहे. लवकरच या प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व महत्त्वाचा तपशील अधिकृत वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

दहावीनंतर तंत्रज्ञान विश्र्वातील शिक्षणासाठी डिप्लोमा हा एक उत्तम पर्याय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असतो. त्यामुळे इंजिनिअरिंग डिप्लोमा प्रवेशाला विद्यार्थ्यांचाही उत्तम प्रतिसाद मिळतो. दहावी-बारावीचे निकाल लागल्यानंतर डिप्लोमा आणि डिग्रीच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात होते. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असल्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची लगबग सुरू होते. हे लक्षात घेऊन तंत्रशिक्षण संचालनालयाने नवीन शैक्षणिक अधिपत्याखालील प्रथम वर्ष पदविका व थेट द्वितीय वर्षात अभियांत्रिकी पदविका प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेशासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची यादी जाहीर केली आहे. यामुळे कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यास विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ मिळणार आहे. सध्या पॉलिटेक्नीक प्रवेशासाठी पालक, विद्यार्थ्यांतून विचारणा होत आहे. बरेच पालक, विद्यार्थी लातूर शहरातील पॉलिटेक्नीक कॉलेजला भेट देऊन विचारण करीत आहेत.

## चन्नबसवेश्वर फार्मसीत ५१ जणांनी केले रक्तदान

तभा वृत्तसेवा



लातूर, दि. १८ : उन्हाळ्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत शहरातील चन्नबसवेश्र्वर फार्मसी कॉलेजच्या वतीने बुधवारी रक्तदान शिबीर घेण्यात आले. त्यात ५१ जणांनी रक्तदान केले.

यावेळी प्राचार्य डॉ. संजय थोंटे, डॉ. अविनाश टेकाडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. भीमाशंकर हुच्चे, माऊली रक्तपेढीचे बालाजी जाधव, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे आदी उपस्थित होते.

यावेळी प्रा. हुच्चे यांनी रक्तदानाचे महत्त्व सांगून विद्यार्थ्यांना रक्तदान करण्याचे आवाहन केले. यशस्वीतेसाठी प्रा. महेश मानके, प्रा. वसीम काझी, प्रा. प्रशांत बनसोडे, प्रा. रोहित कोंबडे, शिवहार विभूते, सिद्धेश्र्वर स्वामी, प्रमोद स्वामी, विशाल निलंगेकर, विजयकुमार उपासे, सिद्धांत बिडवे आदींनी परिश्रम घेतले.

# लातूरच्या ज्ञानेश्वर मलीले यांना मधुमित्र पुरस्कार जाहीर

## छत्रपती संभाजीनगर येथे २० मे २०२६ रोजी होणार पुरस्कारांचे वितरण

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ : महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने दिले जाणारे २०२६ सालचे 'मधुमित्र' व 'मधु-सखी' पुरस्कार लातूरचे ज्ञानेश्र्वर मलीले, छत्रपती संभाजीनगरचे गणेश बुरकुल, बुलढाण्याचे राजेंद्रदास बैरागी आणि पुण्याच्या श्र्वेता वायाळ यांना जाहिर झाले आहेत. याशिवाय निवड समितीने ठाण्याचे चंद्रकांत तरे, पुण्याचे संजय मारणे, कोल्हापूरचे दयावान पाटील आणि जळगावचे विद्यानंद आहिरे यांची विशेष सन्मानासाठी निवड केली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती (राज्यमंत्री दर्जा) रवींद्र साठे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या 'मधाचे गाव' तसेच जागतिक मधमाशी दिनाच्या निमित्ताने योजलेला 'मधु मित्र - मधु सखी पुरस्कार' तसेच मंडळाच्या विविध कार्याविषयीची सभापती साठे यांनी दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मण राऊत, सहमुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र ठाकरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील उपस्थित होते.

'मधु मित्र' आणि 'मधु सखी' पुरस्काराचे वितरण २० मे २०२६ या जागतिक मधमाशी दिनी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात होणार असल्याचे सांगून सभापती साठे म्हणाले की, महाराष्ट्रातील मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने २०२३ पासून ही पुरस्कार योजना सुरू केली आहे. या पुरस्कारामध्ये स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रक्कमेचा समावेश आहे.

राज्यात मधमाशीपालनास प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाच्या मध संचालनालयामार्फत प्रशिक्षण, जनजागृती मेळावे, मध महोत्सव, 'मधाचे गाव' योजना तसेच मधुमित्र-मधुसखी पुरस्कार असे विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे सभापती साठे यांनी सांगितले. 'मधाचे गाव' योजनेसाठी राज्य शासनाने १७ कोटी रुपयांची तरतूद केली असून पहिल्या टप्प्यात दहा जिल्ह्यांतील दहा गावांमध्ये काम सुरू झाले आहे. गेल्या दोन महिन्यांत ३४८ मधपाळांना प्रशिक्षण देण्यात आले असून १७५० मधपेट्या, संरक्षण पोशाख, मध यंत्र आणि अन्य साहित्याचे वितरण करण्यात आले आहे.

या योजनेमुळे निसर्ग संवर्धन, मध उत्पादनवाढ, ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार असल्याचा विश्र्वास साठे यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ गेली ६५ वर्षे कार्यरत असून पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, प्रधानमंत्री विश्र्वकर्मा कौशल्य योजना आणि मध केंद्र योजना यांची अंमलबजावणी मंडळामार्फत केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वदेशी उत्पादनांच्या वापराचे केलेले आवाहन लक्षात घेऊन मंडळाने हर घर खादी, घर घर खादी ही मोहीम सुरू केली असल्याचेही सभापती साठे यांनी सांगितले.

ग्रामीण भागातील उद्योजकांनी तयार केलेली खादी वस्त्रे, हातकागदापासून बनविलेल्या वस्तू, गणेशमूर्ती तसेच मधापासून तयार होणारी सौंदर्यप्रसाधने नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करावीत, असे आवाहन सभापती साठे यांनी केले.

राज्यात पारंपरिक मध उत्पादनाला चालना देण्यासाठी शासनाने १२ मधगावांना मान्यता दिली असून त्यामध्ये पालघर जिल्ह्यातील घोलवड, नांदेड जिल्ह्यातील भंडारवाडी, नंदुरबार जिल्ह्यातील बोरझर, हिंगोली जिल्ह्यातील काकडदाभा, नाशिक जिल्ह्यातील चाकोरे, अहिल्यानगर जिल्ह्यातील उडदावणे, परभणी जिल्ह्यातील शेलमोहा, वर्धा जिल्ह्यातील सिंधीविहीर, सातारा जिल्ह्यातील सालोशी, अमरावती जिल्ह्यातील आमझरी, धुळे जिल्ह्यातील रामी आणि रत्नागिरी जिल्ह्यातील तळवडे या गावांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील मध उत्पादकांना बाजारपेठ, प्रशिक्षण व आर्थिक सक्षमीकरणाची संधी उपलब्ध होणार असल्याची माहिती सभापती साठे यांनी यावेळी दिली.

पीएम विश्र्वकर्मा योजनेअंतर्गत महाराष्ट्रात एकूण २७,५२९ ऑनबोर्डेड ग्रामपंचायतींतील प्रशिक्षणासाठी नोंदणीकृत २,४५,०२६ लाभार्थी असून कर्ज वितरण आर्थिक लाभार्थ्यांची संख्या ५३,५९३ असल्याचे सांगत सभापती साठे यांनी २०२५-२६ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत राज्यात ५,७९१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असल्याची माहिती दिली. यासाठी ९७२३.१८ लाख रूपयांचे मार्जिन मनी मंजूर करण्यात आले. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत १,०७८ प्रकल्पांसाठी २०२१.९८ लाख रूपयांचे मार्जिन मनी वितरित करण्यात आले असून या माध्यमातून ८,६२४ रोजगार निर्मिती झाली आहे. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत महाराष्ट्रात १,६२५ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून ५९४७.५लाख रुपयांचे मार्जिन मनी वितरित करण्यात आले असल्याचे सभापती साठे यांनी सांगितले.

## कोम्बिंग ऑपरेशनमध्ये चार शस्त्रधारींवर कारवाई

तभा वृत्तसेवा



लातूर, दि. १८ : पोलिसांच्यावतीने शनिवारी (दि.१६) मध्यरात्रीनंतर राबविण्यात आलेल्या 'ऑलआऊट' व 'कोम्बिंग ऑपरेशन' मोहिमेत ४ जणांकडून धारदार शस्त्र जप्त करण्यात आले. दबा धरून बसलेल्या ५ आरोपींवर प्रतिबंधात्मक गुन्हे दाखल करून ३५ सराईत गुन्हेगारांच्या घरी जाऊन तपासणी करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशाने, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात ही मोहीम राबविण्यात आली. यात जिल्हा पोलीस दलातील ३३ पोलीस अधिकारी, १४५ पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

या ऑपरेशनदरम्यान पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांच्या घरांवर अचानक भेट देऊन त्यांच्या हालचालींची पडताळणी करण्यात आली. सध्या ते कुठे आहेत, कोणत्या प्रकारचा व्यवसाय करतात, त्यांच्या वर्तनात काही संशयास्पद बदल आहे का, याची चौकशी करण्यात आली. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर लक्ष केंद्रीत करून त्यांना समज देण्यात आली. या मोहिमेत ४ जणांवर शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. त्यांच्याकडून अवैध शस्त्रे जप्त करण्यात आली. रात्रीच्या वेळी चोरीच्या उद्देशाने दबा धरून बसलेल्या ५ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

ऑपरेशनअंतर्गत ३५ रेकॉर्डवरील घरफोडी व इतर गुन्ह्यांतील सराईत आरोपींच्या राहत्या घरी भेट देऊन त्यांच्या हालचालींची माहिती घेण्यात आली. त्यांना भविष्यात कोणतेही समाजविघातक कृत्य न करण्याबाबत समज देण्यात आली. ११७ लॉजेस व हॉटेल्सची तपासणी करण्यात आली. ३० संवेदनशील (मर्मस्थळ) ठिकाणांना भेटी देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात विविध ३३ ठिकाणी नाकाबंदी करून ४२३ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली.

मद्यपान करून वाहन चालविणाऱ्या ७वाहनचालकांविरुद्ध खटले दाखल करण्यात आले.

## केशवराज मंदिरात पंच कुंडात्मक याग पवमान स्वाहाकार महायज्ञाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १८ : येथील श्री केशवराज मंदिरात दि. २१ ते दि. २३ मे २०२६ या कालावधीत पंच कुंडात्मक महाविष्णू याग व पवमान स्वाहाकार महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक विवधि श्रीक्षेत्र मोहटादेवीचे प्रधान आचार्य बबनदेव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे.

प्रत्येक तीन वर्षांनी येणाऱ्या अधिकमासाच्या निमित्ताने यावर्षीच्या अधिकमासामध्ये पूर्णवादाचार्य सद्गुरु श्री रामचंद्र महाराज पारनेरकर यांच्या शुभाशिर्वादाने व पूर्णवाद वर्धिष्णू विष्णू महाराज पारनेरकर यांच्या प्रेरणेने सदर धार्मिक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यज्ञकाळात सामूहिक श्री विष्णू सहस्त्रनाम पठण , सामूहिक श्री सूक्त पठण व कुंकुमार्चन तसेच स्वर्णीनंद ग्रुपकडून गायनसेवा सादर होणार आहे. दररोज सायंकाळी आठ ते नऊ या वेळेत भजनसेवा होणार आहे. या पवित्र काळात श्री केशवराजच्या मूर्तीस तीन दिवस विष्णू सहस्त्रनामासह १ लाख तुलशी अर्पण केल्या जातात . या सोहळ्याचे मुख्य महाप्रसाद यजमान दीपक हरी कोटलवार हे आहेत. मुख्य तुलशी अर्चना यजमान पापशेठ ताथवडे परिवार, मुख्य यज्ञ यजमान धर्मवीर भारती , आयोजक केशवराज मंदिर हे आहेत.

या धार्मिक सोहळ्याचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा,असे आवाहन केशवराज मंदिरचे विश्र्वस्त अध्यक्ष एड. संजय पांडे, उपाध्यक्ष बजरंगलाल रांदड, सचिव मधुकर पाठक , अशोक गोविंदपूरकर, पापासेठ ताथोडे , एड. कालिदास देशपांडे, मनोहर सावळे, मधुसूदन भुतडा, दामोदर भुतडा, राजाभाऊ पांडे, शाम कोटलवार , योगेश उन्हाळे, सुनील अयाचित, सुमुख गोविंदपूरकर यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात विद्यार्थी संघटना आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १८ मे -**

नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, विरोधात राज्यातील विद्यार्थी संघटना आक्रमक झाल्या असुन दोषीवर कारवाई करावी यासाठी मोर्चे, धरणे आदोलन करण्यात येत आहेत.

**एसएफआयचे तीव्र आंदोलन**

नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी, निकालातील सावळागोंधळ आणि शिक्षण क्षेत्रातील वाढत्या भ्रष्टाचाराविरोधात १८ मे रोजी स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) नांदेड जिल्हा कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी संतप्त विद्यार्थ्यांनी केंद्र सरकार आणि शिक्षण माफियांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. आंदोलनानंतर एसएफआयच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

या निवेदनात एसएफआयने आरोप केला आहे की, राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने (एनटीए) नीट परीक्षेच्या गोपनीयतेचा पुरता खेळ खंडोबा केला असून वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे सामान्य कुटुंबातील गोरगरीब विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची केंद्र सरकारने क्रूर थट्टा केली आहे. हा केवळ एक घोटाळा नसून प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या कष्टाची दिवसाढवळ्या झालेली लूट आहे. या पार्श्वभूमीवर, देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या या गंभीर घोटाळ्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मुख्य मागणी




संघटनेने केली आहे.

तसेच या संपूर्ण घोटाळ्याची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत सखोल व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, पेपरफुटीच्या मुख्य सूत्रधारांना कठोर कायद्यांतर्गत जन्मठेपेची शिक्षा व्हावी आणि ज्या परीक्षा केंद्रांवरून हे गैरप्रकार झाले आहेत त्यांची मान्यता त्वरित रद्द करण्यात यावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत. जोपर्यंत परीक्षा प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता येत नाही तोपर्यंत दोषींवर कठोर कारवाई सुरूच राहावी, असेही निवेदनात नमूद केले आहे.

शिक्षण संस्थांच्या व्यापारीकरणामुळे आणि केंद्र व राज्य सरकारच्या निष्क्रियतेमुळे आज तरुण विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नैराश्य पसरले असून लाखो तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त होण्याची भीती निर्माण झाली आहे. स्थानिक प्रशासनाने या निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन आमच्या मागण्या तात्काळ केंद्र सरकारकडे पोहोचवाव्यात, अशी विनंती एसएफआयने केली आहे. या आंदोलनात नांदेड जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थी आणि एसएफआय चे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**विद्यार्थी कृती समितीचे उद्या धरणे आंदोलन**

लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणाविरोधात विद्यार्थी कृती समितीच्या वतीने दि.२० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती कृती समितीच्या वतीने पत्रकार परिषदेत देण्यात आली.

नीट पेपरफुटी प्रकरणात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार, दलालांचे जाळे आणि संस्थात्मक निष्काळजीपणा समोर येत आहे. त्यामुळे या प्रकरणाची चौकशीच्या घोषणा न करता कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. यामुळेया प्रकरणात केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांची चौकशी करुन त्यांचा राजीनामा घ्यावा, एनटीएचे महासंचालक अभिषेकसिंघ यांच्यावर देखील कारवाई करुन त्यांचाही राजीनामा घेण्यात यावा, पेपरफुटीमुळे मानसिक तणावातून आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, घोटाळ्यात सहभागी असलेल्या सूत्रधार, दलाल, अधिकारी, लाभार्थ्यांवर कठोर कारवाई करावी, दोषींवर युएपीए किंवा तत्सम कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना केंद्र सरकारकडून आर्थिक मदत द्यावी, एनटीएची व्यापक पुनर्ररचना करुन परिक्षेत पारदर्शकता आणावी आदीसह अन्य मागण्यांसाठी हे धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे विद्यार्थी कृती समितीच्या वतीने सांगण्यात आले.

# रस्त्याच्या कामाच्या नावाखाली मुरूम माफियांचा धुमाकूळ



**तभा वृत्तसेवा**
**देगलूर, दि. १८ मे -**

तालुक्यातील हाणेगाव ते लोणी या महत्त्वाच्या रस्त्याचे काम सुरू असताना रस्त्यासाठी लागणाऱ्या मुरूमाचे सर्रास नियमबाह्य व अवैधरित्या उत्खनन सुरू असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत असताना देगलूर महसूल प्रशासन मात्र दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत भाजपा नांदेड दक्षिण दिव्यांग आघाडी सेलचे जिल्हाध्यक्ष मारोती मोरेवाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे निवेदन देऊन चौकशी व कठोर कारवाईची मागणी केली आहे.

देगलूर ते औराद या तीन राज्यांच्या सीमेला जोडणाऱ्या हाणेगाव-लोणी रस्त्याचे काम सध्या संथगतीने सुरू असून, या कामासाठी आवश्यक मुरूम इस्टिमेटमध्ये नमूद केलेल्या ठिकाणाहून न आणता लोणी शिवारातील रस्त्यालगतच्या सातबारा माळरान क्षेत्रातून विनापरवानगी उत्खनन करण्यात येत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

**पर्यावरण व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर !**

गुत्तेदाराने शासनाकडे भरावयाची रॉयल्टी टाळून स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या मुरूम उत्खनन केल्यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडाल्याचेही मोरेवाड यांनी म्हटले आहे. या उत्खननामुळे अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले असून परिसरातील पर्यावरण आणि नागरिकांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. अवैध उत्खनन केल्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. तसेच निर्माण झालेल्या खड्ड्यांमुळे नागरिकांच्या जीवीत हानीस धोका होऊ शकतो. त्यामुळे दुहेरी धोका निर्माण करणाऱ्या गुत्तेदारावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**अवैध मुरुम उत्खनन प्रशासनच्या दृष्टीस का आले नाही ?**

मुरूम उत्खननासाठी तहसील कार्यालयाची परवानगी तसेच संबंधित विभागांचे ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असतानाही नियम धाब्यावर बसवून हे उत्खनन सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तलाव परिसर, शासकीय पडीक जमीन आणि खडकाळ भागातही अवैध उत्खनन सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे तालुक्यातील अवैध मुरुम उत्खनन होत असल्यास महसूल प्रशासनाकडून कारवाई होणे अपेक्षित असते, परंतु हे अवैध मुरुम उत्खनन प्रशासनच्या दृष्टीस का आले नाही ? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. या प्रकरणात काही मिलीभगत तर नाही ना! असा संशय काहीजण घेत आहेत. या अवैध मुरुम उत्खनन करणाऱ्यांवर होणाऱ्या कारवाईअंती हे स्पष्ट होईल. महसूल प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने संबंधित गुत्तेदाराची सखोल चौकशी करून शासनाचा महसूल बुडवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मारोती मोरेवाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे केली आहे.

## लोहा तालुक्यातील ग्रामस्थांशी आ. चिखलीकर यांचा संवाद

**लोहा -** आ. प्रतापराव पाटील यांनी तालुक्याच्या शेवटच्या टोकावर असलेल्या गौंडगाव, दक्षिण आंडगा, आंडगा तांडा, या भागात शनिवारी रात्री भेटी दिल्या. ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांच्या अडीअडचणी जाऊन त्याचे निराकरण केले. तसेच दक्षिणआंडगा येथे बाळूमामाच्या



मंदिरासाठी दहा लक्ष रुपयांचा निधी प्रतापराव पाटील यांनी जाहिर केला तर धारबा पाटील, अंबादास जहागीरदार यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शनिवारी गौंडगाव, दक्षिण आंडगा, तांडा या गावात रात्री ग्रामस्थांसोबत चर्चा केली तर रविवारी सकाळीच टाकळगाव , पांगरा, किवळा या भागात भेटी दिल्या. लोहा तालुक्याचं शेवटचं टोक म्हणजे दक्षिणआंडगा येथे जाऊन गावकऱ्यांशी हितगुज केले. या पुनर्वसित गावात बाळूमामाच्या मंदिरावर स्लॅप नाही त्यासाठी सभागृह द्यावे असे मागणी तेथील ग्रामस्थांनी केली. त्यासाठी दहा लक्ष रुपयांचा निधी देण्याचे आ. प्रतापराव पाटील यांनी जाहिर केले. कार्यकर्ते कैलास मामडगे यांनी त्यांचा निवासस्थानी हृदयपूर्वक सत्कार केला. त्याच्या सोबत पंचायत समितीचे माजी सभापती आनंदराव पाटील ढाकणीकर , माजीं उपसभापती रोहित पाटील आंडगेकर माळेगाव सरपंच हनुमंतराव धुळगुंडे, खेडकर वाडीचे सरपंच खेडकर, दापशेडचे माजी सरपंच भद्रीनाथ , माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रमुनी मस्के माजी पं स सदस्य बाबुराव कांबळे, माळाकोळी ग्रा प सदस्य परमेश्वर मुरकुटे, माजी सरपंच पिराजी धुळगंडे , गणपतराव तिडके, बाळू पाटील बाबर, रामदास हाके, ग्रामपंचायत सदस्य बाबुराव वाघमारे, प्रभाकर सुरनर, संजय चव्हाण, श्रीराम फाजगे, शिंदे पाटील दाताळकर उपस्थित होते.

## शेतकरी बांधवांना खरीप हंगामात कोणतीही अडचण येऊ नये; आ.कोहळीकरांचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १८ मे -**

आगामी खरीप हंगामाच्या पूर्वी शेतकरी बांधवांना बियाणे, खते व इतर आवश्यक सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावेत विनाकारण कोणालाही याचा त्रास होता कामा नये असा स्पष्ट इशारा वजा सूचना आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी दिल्या असून खरीप पूर्व हंगाम नियोजन आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानी वरून ते बोलत होते.

हदगाव तालुक्यातील शेतकरी बांधवांचे लक्ष आता मान्सून कडे लागले आहेत. त्यातच पूर्व अनुभव लक्षात घेता खते, बी- बियाणे इतर साहित्यांकरिता होणारी परवड, दैना यावर्षी होऊ नये याकरिता आ.कोहळीकर यांच्या अध्यक्षतेखाली खरीप पूर्व हंगाम



नियोजन आढावा बैठक घेण्यात आली त्यात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समस्या, अडचणी व कृषी विभागाशी संबंधित विषयांवरती सखोल चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांना वेळेवर बियाणे, खते व आवश्यक सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आले. यावेळी कृषी विभागाचे अधिकारी तसेच संभाराव लांडगे, बाळासाहेब कदम, बाबूसराव कदम, गोपाळ सारडा, अनिल पा. बाभळीकर, भास्कर वानखेडे, संदेश हडसनीकर, सुदर्शन पा. मनुलेकर, बाबुराव काळे यांच्यासह इतर सहकारी उपस्थित होते.

## लताताई कंधारे यांचे निधन

**नवीन नांदेड** -सिडको मधील वात्सल्यनगर सोसायटीतील रहिवासी सौ.लताताई प्रभाकरराव कंधारे यांचे अल्प आजाराने निधन झाले. मृत्यू



समयी त्या ६५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, पाच मुले,एक मुलगी, सूना,नातवंडे,असा मोठा परिवार आहे. सेवानिवृत्त पोस्ट मास्तर प्रभाकरराव खंदारे यांच्या त्या पत्नी तर सामाजिक कार्यकर्त्या ड.जयश्री खंदारे, राजेश, चंद्रभूषण, इंद्रजित, रविकिरण व बिपीन कंधारे यांच्या त्या मातोश्री होत. सौ. लताताई कंधारे ह्या किडनीच्या आजाराने त्रस्त होत्या. खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पार्थिव देहावर सिडको येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## नायगांव पोलिसांना चोरट्यांचे खुले आव्हान

**तभा वृत्तसेवा**
**नरसी , दि. १८ मे -**

नायगांव पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी अक्षरशः धुमाकूळ घालत पोलिसांनाच खुले आव्हान दिल्याचे चित्र निर्माण झाले आहे. कोलंबी व गोदमगाव येथे शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास एकाच रात्री तीन ठिकाणी धाडसी चोरीच्या घटना घडल्याने परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घरफोडी, दुकानफोडी आणि दुचाकी चोरी अशा सलग घटनांमुळे नायगांव पोलीस नेमके करतात तरी काय? असा संतप्त सवाल ग्रामस्थांतून उपस्थित होत आहे.

**कोलंबी, गोदमगाव येथे एका रात्रीत तीन ठिकाणी धाडसी चोरी; लाखोंचा ऐवज लंपास**

कोलंबी येथील साईनाथ गणपती पोतलवाड यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी रात्री साडेअकराच्या सुमारास प्रवेश करून कपाट फोडत अंदाजे अडीच तोळे सोन्याचे दागिने, अर्धा किलो चांदी आणि तब्बल दीड लाख रुपयांची रोख रक्कम लंपास केली. विशेष म्हणजे घरातील सदस्य घरातच झोपलेले असताना चोरट्यांनी ही चोरी केल्याने नागरिकांमध्ये प्रचंड दहशत पसरली आहे. चोरटे इतके बेधडक झाले आहेत की, घरात लोक असतानाही त्यांनी चोरी करण्याचे धाडस दाखविले.

या घटनेनंतर काही अंतरावरील मुख्य रस्त्यावर असलेल्या प्रताप नागोजी बैस यांच्या रसवंतीगृहाचे कुलूप तोडून दुकानातील पाण्याच्या बाटल्या, पाणी पाऊच व इतर साहित्य चोरून नेण्यात आले. तर कोलंबीपासून अवघ्या दोन किलोमीटरवरील गोदमगाव येथे साहेबराव बालाजी बोंडले यांच्या घरासमोर उभी असलेली मोटारसायकलही अज्ञात चोरट्यांनी पळवून नेली.

एकाच रात्री सलग तीन ठिकाणी चोरीच्या घटना घडल्याने नायगांव पोलीस ठाण्याच्या गस्त व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मागील काही महिन्यांत नायगांव शहरासह ग्रामीण भागात अनेक दुकाने, घरे आणि वाहन चोरीच्या घटना घडल्या आहेत. मात्र यातील अनेक प्रकरणांचा तपास अद्यापही रखडलेलाच असून चोरटे मोकाट फिरत आहेत. त्यामुळे चोरट्यांचे मनोबल वाढले असून पोलिसांचा धाक संपल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

रात्री गस्त दिसत नाही, चोरी झाल्यावर फक्त पंचनामा होतो, पण आरोपी सापडत नाहीत, अशी तीव्र नाराजी ग्रामस्थांनी व्यक्त केली. काही नागरिकांनी तर चोरटे पोलिसांच्या नाकावर टिच्चून चोरी करत आहेत, अशी संतप्त प्रतिक्रिया दिली.

## गॅस वितरणाच्या भोंगळ कारभाराविरोधात रिकाम्या टाक्या फेकल्या रस्त्यावर

**तभा वृत्तसेवा**
**नरसी, दि. १८ मे -**

नायगाव शहरातील गॅस वितरण व्यवस्थेच्या भोंगळ कारभाराविरोधात सोमवारी नागरिकांचा संताप अखेर रस्त्यावर उतरला. शहरातील डॉ. हेडगेवार चौकात आज दि .१८ मे रोजी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास शेकडो नागरिकांनी रिकाम्या गॅस टाक्या थेट रस्त्यावर फेकून चक्काजाम आंदोलन छेडले. या अचानक उभ्या राहिलेल्या आंदोलनामुळे नांदेडहैदराबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक जवळपास तासभर पूर्णपणे विस्कळीत झाली होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने पोलिस व प्रशासनाने वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला.

गेल्या अनेक दिवसांपासून शहरात घरगुती गॅस सिलेंडर वितरणात मोठा विलंब होत असल्याने नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. ऑनलाईन बुकिंग करून जढ्झ प्राप्त होऊनही तब्बल दहा ते पंधरा दिवस गॅस सिलेंडर घरपोच मिळत नसल्याची गंभीर तक्रार नागरिकांनी केली. अनेक कुटुंबांमध्ये स्वयंपाकाचे हाल होत असून महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांचे मोठे हाल सहन करावे लागत असल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, वारंवार



एजन्सीशी संपर्क साधूनही समाधानकारक उत्तर दिले जात नसून वितरण व्यवस्थेत पूर्णपणे निष्काळजीपणा दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. सोमवारी सकाळी काही नागरिक गॅस संदर्भात विचारणा करण्यासाठी शगुन इंडियन कार्यालयात गेले असता कार्यालय बंद असल्याचे दिसून आले. यामुळे आधीच संतप्त असलेल्या नागरिकांचा संताप अनावर झाला आणि त्यांनी थेट डॉ. हेडगेवार चौक गाठत रिकाम्या गॅस टाक्या रस्त्यावर ठेवून रास्ता रोको आंदोलन सुरू केले.

अचानक सुरू झालेल्या आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीचा पूर्णपणे खोळंबा झाला. महामार्गावर अडकलेल्या वाहनचालकांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागला. घटनास्थळी पोलीस प्रशासनाने तातडीने धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र नागरिक आक्रमक भूमिकेत असल्याने वातावरण अधिकच तापले होते.

दरम्यान, बिलोलीचे उपविभागीय पोलिस अधिकारी श्याम पानेगावकर यांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती हाताळली व आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर तहसील प्रशासनाशी संपर्क साधण्यात आला. तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांच्याशी संपर्क साधून नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत आश्वासन घेण्यात आले. तसेच नायब तहसीलदार येरावार यांनी घटनास्थळी दाखल होत नागरिकांशी चर्चा केली.

प्रशासनाकडून गॅस वितरणाचा प्रश्न तातडीने मार्गी लावला जाईल, नागरिकांची प्रत्यक्ष बैठक घेऊन संबंधित एजन्सीकडून योग्य कार्यवाही केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी अखेर चक्काजाम मागे घेत रस्ता मोकळा केला.

या घटनेमुळे नायगावातील गॅस वितरण व्यवस्थेतील अनागोंदी कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून प्रशासनाने तातडीने कठोर भूमिका घेण्याची मागणी सर्व सामान्य नागरिकांतून होत आहे.

## किनवट तालुक्यातील पांदण रस्त्यांच्या कामांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष



**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. १८ मे -**

तालुक्यात शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांसाठी मंजूर करण्यात आलेल्या पांदण रस्त्यांच्या कामांना अद्यापही गती मिळालेली नसल्याने शेतकरी वर्गातून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. युद्धपातळीवर कामे करण्याचे आदेश असतानाही बहुतांश रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.

शेतकऱ्यांना शेतीसाठी बाराही महिने रस्त्यांची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने शासनाने पांदण रस्त्यांची योजना सुरू केली होती. मात्र संबंधित अधिकारी, कर्मचारी व तहसील प्रशासन यांनी या योजनेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. एखाद-दुसऱ्या गावातील कामे सुरू असली तरी बहुतांश गावांमध्ये रस्त्यांची कामे रखडलेली आहेत.

यासंदर्भात शेतकरी प्रशासनावर नाराजी व्यक्त करत नागझरी, मांडवा, कोठारी,घोटी, कमठाला, बोधडी,सारखणी परिसरातील अनेक पांदण रस्ते व शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून अद्यापही अनेक रस्ते चिखलमय अवस्थेत रहाणार आहेत.

लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांकडून वेळोवेळी पाठपुरावा करूनही कामांना गती मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः लक्ष घालून किनवट तालुक्यातील प्रलंबित पांदण रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावीत व नागझरी, मांडवा, कोठारी परिसरातील शेतकऱ्यांचे प्रश्न मार्गी लावावेत. तसेच लोकसहभागातुन झालेल्या रस्ते पके करण्यासाठी निधी उपलब्ध करून दयावे अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

## ग्राम पंचायतीच्या लेखी आश्वासनानंतर गोकुंद्यातील आमरण उपोषण मागे

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. १८ मे -**

मौजे गोकुंदा येथील वार्ड क्रमांक ४ व ५ मधील नागरिकांनी मूलभूत सुविधांच्या मागणीसाठी ग्रामपंचायत कार्यालयासमोर सोमवारी (दि. १८ मे) सुरू केलेले आमरण उपोषण ग्रामपंचायतीच्या लेखी आश्वासनानंतर मागे घेण्यात आले.

वार्ड क्रमांक ५ मधील छत्रपती राजे मराठा हॉस्टेलच्या बाजूने तलावाकडे जाणारा रस्ता, नाली आणि नळकांडी पुलाचे काम तातडीने करण्यात यावे, या मागणीसाठी नागरिकांनी आंदोलन छेडले होते. कडक उन्हातही महिलांनी उपोषण सुरू ठेवल्याने या आंदोलनाची परिसरात मोठी चर्चा होती.



या संदर्भात नागरिकांनी दि. ११ मे रोजी पंचायत समिती किनवटच्या गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले होते. त्यानंतर ग्रामपंचायत गोकुंदाने आंदोलनकर्त्यांनाआज लेखी पत्र देत संबंधित कामांबाबत सकारात्मक भूमिका स्पष्ट केली.

ग्रामपंचायतीने दिलेल्या पत्रानुसार, संबंधित रस्त्याचा आराखडा वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात आला आहे. नळकांडी पुलासाठी आवश्यक सिमेंट पाइप उपलब्ध करण्यात आले असून त्या कामास तातडीने सुरुवात करण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच संबंधित रस्त्याच्या कामासाठी यापूर्वीच आमदार स्थानिक विकास निधी २०२६-२७ अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे ग्रामपंचायतीने स्पष्ट केले. ग्रामपंचायतीकडे निधी उपलब्ध होताच नागरिकांच्या मागणीनुसार आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही पत्रात नमूद करण्यात आले.

ग्रामपंचायतीच्या या लेखी आश्वासनानंतर आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला सहकार्य करण्याची भूमिका घेत उपोषण मागे घेतले.

या उपोषणात राखी राजू राठोड, शोभा बिभीषण सानप, सविता संतोष आडे यांच्यासह वार्ड क्रमांक ४ व ५ मधील अनेक महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रस्ता, नाली, पाणी आणि इतर मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर लवकर कार्यवाही होणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.